प्रकरण-II

व्यवहारांची लेखापरीक्षा

प्रकरण-II

व्यवहारांची लेखापरीक्षा

शासकीय विभाग, त्यांची क्षेत्रीय कार्यालये तसेच स्वायत्त संस्था आणि सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम यांच्या व्यवहारांच्या लेखापरीक्षेत साधनसंपत्तीचे व्यवस्थापन आणि नियमितता, औचित्त्यता आणि काटकसर यांच्या मानकांचे पालन करण्यात त्रुटी आढळून आल्या. पुढील परिच्छेदामध्ये त्या प्रस्तुत केल्या आहेत.

उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग

2.1 राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान

2.1.1 प्रस्तावना

केंद्र सरकारच्या मानव संसाधन विकास मंत्रालयाच्या उच्च शिक्षण विभागाने केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान या योजनेची सुरुवात (ऑक्टोबर 2003) केली. राज्यातील पात्र असलेल्या उच्च शैक्षणिक संस्थांना, उच्च शैक्षणिक प्रणालीत सुधारणा करण्यासाठी तसेच राज्यातील विद्यापीठांची आणि महाविद्यालयांची गुणवत्ता सुधारण्यासाठी धोरणात्मक चा पुरवठा करण्याचे राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाचे उद्दिष्ट होते. उच्च शिक्षणात समानता, संधी व उत्कृष्टता साध्य करण्यासाठी राज्य विद्यापीठांना, शासकीय महाविद्यालयांना आणि अनुदानित महाविद्यालयांना पुरवण्यासाठी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान दोन टप्प्यात म्हणजेच राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 1.0 व राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 2.0 जे अनुक्रमे बारावी योजना (2012-17) आणि तेरावी योजना (2017-22) यामध्ये विभागले गेले आहे, त्याची अंमलबाजवणी करावयाची होती. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 1.0 व राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 2.0 मध्ये समाविष्ट घटक **परिशिष्ट 2.1.1** मध्ये तपशीलवार दिलेले आहेत. सर्व घटकांचे प्रकल्प मूल्य हे भारत सरकार आणि महाराष्ट्र शासन यांच्यात 60:40 या प्रमाणात विभागले जाणार होते.

महाराष्ट्रात, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या अंमलबजावणीसाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या अंतर्गत असलेली राज्य उच्च शिक्षण परिषद जबाबदार होती. राज्यात राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या अंमलबजावणीत राज्य प्रकल्प संचालनालय राज्य उच्च शिक्षण परिषदेला सहाय्य करत होते.

2.1.2 लेखापरीक्षेची व्याप्ती आणि पद्धती

खालील मुद्द्यांचे मूल्यांकन करण्यासाठी जुलै 2021 ते ऑक्टोबर 2021 या दरम्यान लेखापरीक्षा करण्यात आली:

- विविध आराखडे जसे की राज्य उच्च शिक्षण आराखडा, संस्थात्मक विकास आराखडा आणि तपशीलवार प्रकल्प अहवाल वेळेत तयार आणि मंजूर झाले होते;
- वेळेवर मुक्त करण्यात आला आणि त्याचे आर्थिक व्यवस्थापन योग्य होते;
- राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या विविध घटकांची अंमलबजावणी मार्गदर्शक तत्त्वांनुसार होती आणि
- संनियंत्रण आणि मूल्यमापन प्रभावी होते.

या उद्देशासाठी उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन आणि राज्य प्रकल्प संचालक यांची 2015-21 या वर्षांमधील दस्तऐवजांची चाचणी तपासणी केली. शिवाय, 13 विद्यापीठांपैकी चार विद्यापीठे, 14 शासकीय महाविद्यालयांपैकी चार महाविद्यालये आणि 50 अनुदानित महाविद्यालयांपैकी 16 महाविद्यालये ज्यांना राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत प्राप्त झाला होता त्यांची लेखापरीक्षेच्या तपासणीसाठी यादृच्छिक पद्धतीने निवड करण्यात आली. तसेच, एक महाविद्यालय ज्याला "नवीन मॉडेल पदवी महाविद्यालये" या घटकांतर्गत वितरित केला होता त्याचीही लेखापरीक्षेसाठी निवड केली होती. निवड केलेल्या संस्थांची नावे **परिशिष्ट 2.1.2** मध्ये दर्शविली आहेत.

डिसेंबर 2021 मध्ये शासनाकडून प्राप्त झालेली उत्तरे अहवालात योग्य ठिकाणी समाविष्ट करण्यात आली आहेत.

लेखापरीक्षेची निष्पत्ति

2.1.3 नियोजन

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या चौकटीत/रचनेत बहुविध आणि श्रेणीबद्ध असमानता दूर करण्यासाठी आणि गरजेनुसार नियोजनाचे प्रचलन करण्यासाठी नियोजन आणि अर्थसंकल्पात विकेंद्रीकरणाधारीत दृष्टीकोन परिकल्पित केला होता. नियोजन प्रक्रियेची सुरुवात ही संस्थात्मक स्तरावर व्हावी ज्यामध्ये संस्थेचा विकास आराखडा असावा. हे संस्थात्मक विकास आराखडे एकत्र करून राज्य उच्च शिक्षण आराखडा तयार करण्यात यावा. राज्य उच्च शिक्षण आराखड्याचे मुख्य दोन घटक आहेत, राज्य घटक आणि संस्थात्मक घटक. राज्य उच्च शिक्षण आराखड्याला वार्षिक आराखड्यामध्ये विभागले आहे जे राज्य शासनाला निश्चित करण्यासाठीचा पाया तयार करतात.

2.1.3.1 राज्य उच्च शिक्षण परिषदेचे गठण करण्यात विलंब.

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या दस्तऐवजानुसार (सप्टेंबर 2013), राज्य शासनाने दोन वर्षाच्या आत राज्य विधानमंडळाच्या अधिनियमाद्वारे राज्य उच्च शिक्षण परिषदेचे गठण करणे आवश्यक होते. राज्य उच्च शिक्षण परिषद ही उच्च शिक्षणासाठी व्यापक, दीर्घकालीन आणि समावेशक उच्च शिक्षणाचा आराखडा विकसित करणारी सर्वोच्च धोरण संस्था आहे. राज्याचा हिस्सा शैक्षणिक संस्थांना वेळेवर हस्तांतरित करण्याची कार्यपद्धती निश्चित करण्यासाठी राज्य उच्च शिक्षण परिषद जबाबदार होती. राज्य उच्च शिक्षण परिषद ही भारत सरकारच्या राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाची सर्वोच्च संस्था आणि राज्य सरकार यांच्या दरम्यान समन्वयासाठी आणि राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या प्रमुख कार्यक्षमता निर्देशकांच्या[1] तुलनेत राज्याच्या संस्थांचे मूल्यमापन करण्यासाठी सुद्धा जबाबदार होती. महाराष्ट्र शासनाने राज्यामध्ये राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या अंमलबजावणीत सहभागी होण्याचे ठरविले (ऑक्टोबर 2013).

महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण परिषद ही राज्यात महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 1994 नुसार अस्तित्वात होती. तथापि, राज्य उच्च शिक्षण परिषदेची रचना राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार नव्हती. डिसेंबर 2016 च्या शासन निर्णयानुसार उच्च आणि तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार परिषदेचे गठण केले. राज्य उच्च शिक्षण परिषद ही अधिनियमांतर्गत अधिसूचित केली नसल्यामुळे व शासन निर्णयानुसार गठित केली असल्यामुळे महाराष्ट्र शासनाने राज्य उच्च शिक्षण परिषदेला राज्यात राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 1.0 च्या अंमलबजावणीसाठी अधिसूचित (ऑगस्ट 2017) केले.

अशाप्रकारे, राज्य उच्च शिक्षण परिषदेला अधिनियमांतर्गत अधिसूचित करण्यास विलंब झाल्यामुळे राज्यात राज्य उच्च शिक्षण परिषद गठित करण्यात 21 महिन्यांचा विलंब झाला.

2.1.3.2 राज्य उच्च शिक्षण आराखडा तयार करण्यात विलंब

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या दस्तावेजांनुसार, प्रत्येक सहभागी राज्याने दहा वर्षांसाठी धोरणात्मक राज्य उच्च शिक्षण आराखडा तयार करणे आवश्यक होते, ज्याचे पुनर्विलोकन पाच वर्षांनंतर केले जाणार होते. लेखापरीक्षेला असे आढळून आले की राज्याकडून दहा वर्षांचा धोरणात्मक आराखडा तयार केला गेला नव्हता.

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 1.0 अंतर्गत राज्य उच्च शिक्षण आराखडा मानव संसाधन विकास मंत्रालयाला 18 जानेवारी 2014 पर्यंत सादर करणे आवश्यक होते.

---

[1] विद्यार्थी प्रवेश आणि संक्रमण दर आणि पदवीधर रोजगार सर्वेक्षण निकाल हे मुख्य निष्पादन निर्देशक आहेत

लेखापरीक्षेला असे आढळून आले की व्यापक, दीर्घकालीन आणि समावेशक उच्च शिक्षण आराखडा सादर करण्यासाठी जबाबदार असलेल्या राज्य उच्च शिक्षण परिषदेच्या अभावामुळे उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 1.0 च्या 2014-17 या कालावधी ऐवजी उच्च शैक्षणिक संस्थांकडून प्राप्त झालेल्या पायाभूत(बेसलाइन) माहितीच्या आधारावर दोन वर्षांसाठी (2015-17) राज्य उच्च शिक्षण आराखडा तयार केला होता. राज्य उच्च शिक्षण आराखडा ज्यामध्ये ₹ 462 कोटी खर्चाचे पाच घटक समाविष्ट केले होते तो ऑगस्ट 2015 मध्ये म्हणजेच 19 महिन्यांच्या विलंबानंतर मानव संसाधन विकास मंत्रालयाला सादर करण्यात आला. मानव संसाधन विकास मंत्रालयाने ₹ 295 कोटी खर्चाच्या राज्य उच्च शिक्षण आराखड्याला मान्यता (सप्टेंबर 2015 ते सप्टेंबर 2019 या कालावधीत) दिली. राज्य उच्च शिक्षण आराखडा 18 घटकांऐवजी फक्त पाच घटकांसाठीच का सादर करण्यात आला याबाबत लेखापरीक्षेला कुठलेही स्पष्टीकरण दिले गेले नाही.

राज्य उच्च शिक्षण परिषदेने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 2.0 अंतर्गत तयार केलेला राज्य उच्च शिक्षण आराखडा उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी मानव संसाधन विकास मंत्रालयाला मे 2018 मध्ये सादर केला. 2018-20 या कालावधीच्या राज्य उच्च शिक्षण आराखड्यामध्ये एकूण ₹ 430.68 कोटी खर्चाचे 12 घटक होते. मानव संसाधन विकास मंत्रालयाने एकूण ₹ 523 कोटी खर्चाच्या राज्य उच्च शिक्षण आराखड्यातील आठ घटकांना (ज्यामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी भारत सरकार यांच्याकडे मागणी केलेल्या अतिरिक्त च्या समावेशासहित) मान्यता (मे 2018 ते सप्टेंबर 2019 दरम्यान) दिली.

अशाप्रकारे, राज्य उच्च शिक्षण परिषदेचे गठण करण्यात आणि राज्य उच्च शिक्षण आराखडा तयार करण्यातील विलंबामुळे राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत परिकल्पित केलेल्या धोरण निर्देश, समन्वय आणि संनियंत्रण यापासून राज्याला वंचित रहावे लागले.

उत्तरात शासनाने राज्य उच्च शिक्षण आराखडा तयार करण्यातील विलंबाचा संबंध प्रशासकीय विलंबाशी लावला.

आर्थिक व्यवस्थापन, योजनेची अंमलबजावणी आणि संनियंत्रण यासंदर्भातील लेखापरीक्षण निष्पत्तींची चर्चा पुढील परिच्छेदांमध्ये केली आहे.

2.1.4 आर्थिक व्यवस्थापन

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, राज्याने राज्य प्रकल्प संचालनालयाद्वारे यथोचितरित्या मंजूर केलेले प्रत्येक संस्थेचे घटकनिहाय तपशीलवार प्रकल्प अहवाल प्रकल्प मंजुरी मंडळाकडे सादर करणे आवश्यक होते. प्रकल्प मंजुरी मंडळाच्या मंजुरीनंतर राज्याला निधी मुक्त केला जातो, ज्यामध्ये राज्य स्वतःचे योगदान देऊन संस्थांना राज्य प्रकल्प संचालनालयाद्वारे वितरित करते.

2.1.4.1 अनुदान व खर्च

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 1.0 आणि राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 2.0 अंतर्गत घटकनिहाय मंजूर राज्य उच्च शिक्षण आराखड्यांचा तपशील **परिशिष्ट 2.1.3** मध्ये दर्शविला आहे. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 1.0 आणि राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 2.0 अंतर्गत भारत सरकारचा हिस्सा व महाराष्ट्र शासनाचा हिस्सा याच्या तुलनेत सन 2015-21 पर्यंत झालेल्या खर्चाचा तपशील **तक्ता 2.1.1** मध्ये दिला आहे.

तक्ता 2.1.1: 2015-21 मध्ये मिळालेल्या अनुदानाच्या तुलनेत झालेला खर्च

(₹ कोटीत)

वर्ष	केंद्राने वाटप केलेला हिस्सा	केंद्राने मुक्त केलेला हिस्सा	राज्याने मुक्त करणे आवश्यक असलेला हिस्सा	राज्याने मुक्त केलेला हिस्सा	एकूण मुक्त केलेला निधी (3+5)	झालेला खर्च	शिल्लक (संचयी)
1	2	3	4	5	6	7	8
2015-16	34.50	34.50	23.00	16.44	50.94	0.00	50.94
2016-17	1.80	1.80	1.20	7.76	9.56	43.85	16.65
2017-18	57.00	57.00	38.00	31.38	88.38	35.58	69.45
2018-19	45.18	45.18	30.12	36.74	81.92	60.85	90.52
2019-20	87.70	54.40	58.47	36.27	90.67	48.61	132.58
2020-21	0.00	33.30	0.00	22.20	55.50	94.18	93.90
एकूण	**226.18**	**226.18**	**150.79**	**150.39**	**376.97**	**283.07**	
स्रोत: शासनाने वितरित केलेले आदेश आणि राज्य प्रकल्प संचलनालयाद्वारा सादर केलेली माहिती.							

2.1.4.2 स्थूल राज्य उत्पन्नाच्या (जीएसडीपी) तुलनेत उच्च शिक्षणावरील खर्च

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत साठी पात्र होण्यासाठी बाराव्या योजनेच्या अखेरीस स्थूल राज्य उत्पन्नाच्या दोन टक्के रक्कम ही उच्च शिक्षणासाठी वितरीत करण्याची पूर्वअट होती.

महाराष्ट्र शासनाने, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानात सहभागी होत असताना उच्च शिक्षणावरील खर्चासाठी स्थूल राज्य उत्पन्नाच्या दोन टक्के रक्कम वाटप करण्याचे मान्य (ऑक्टोबर 2013) केले होते. तसेच महाराष्ट्र शासनाने मानव संसाधन विकास मंत्रालय/राष्ट्रीय मिशन, राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान यांच्याबरोबर केलेल्या मे 2018 च्या सामंजस्य करारात, मार्च 2020 च्या अखेरीस राज्याच्या स्थूल राज्य उत्पन्नाच्या दोन टक्के रक्कम उच्चशिक्षणासाठी वितरीत केली जाईल अशी खात्री दिली होती.

तथापि, लेखापरीक्षेला असे आढळून आले की, वर्ष 2020-21 दरम्यान प्रत्यक्षात केलेला खर्च हा राज्यातील स्थूल राज्य उत्पन्नाच्या फक्त 0.31 टक्के होता. लेखापरीक्षेला पुढे असेही आढळून आले की उच्च शिक्षणावरील खर्चात वाढ

होण्याऐवजी त्यावर खर्चाचा घसरता कल दिसून आला जो **तक्ता 2.1.2** मध्ये दर्शविला आहे.

तक्ता 2.1.2: वर्ष 2015-21 दरम्यान उच्च शिक्षणावर झालेला प्रत्यक्ष खर्च

(₹ कोटीत)

वर्ष	सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न	सांकेतिक स्थूल उत्पन्नाच्या दोन टक्के	उच्च आणि तंत्र शिक्षणावरील खर्च	प्रत्यक्षात केलेला खर्च (टक्केवारी)
2015-16	19,86,721	39,734	7,361.69	0.37
2016-17	21,88,532	43,771	7,197.84	0.32
2017-18	23,82,570	47,651	7,484.61	0.31
2018-19	25,79,628	51,593	7,777.54	0.30
2019-20	28,18,555[2]	56,371	8,152.95	0.28
2020-21	26,61,629[3]	53,233	8,254.29	0.31
स्त्रोत: महाराष्ट्र शासनाचे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रके				

2015-21 या कालावधीत जरी राज्याचे सांकेतिक स्थूल राज्य उत्पन्न 34 टक्क्यांनी वाढले, तरी याच कालावधीत उच्च आणि तंत्र शिक्षणावरील खर्च फक्त 12 टक्क्यांनी वाढला होता.

शासनाने उच्च शिक्षणावरील खर्चाच्या घटत्या प्रमाणाचे कुठलेही कारण दिले नाही परंतु असे सांगितले (डिसेंबर 2021) की उच्च शिक्षणावर अधिक प्रमाणात खर्च करण्याचा शासन प्रयत्न करेल.

2.1.4.3 अनुदान मुक्त करण्यात विलंब

भारत सरकारकडून प्राप्त झालेला निधी राज्य शासनाने राज्याच्या हिश्श्यासह राज्य प्रकल्प संचालनालयाला पंधरा दिवसांच्या आत वितरित करावयाचा होता. या बदल्यात, राज्य प्रकल्प संचालनालयाला प्राप्त झालेला निधी राज्य शासनाकडून प्राप्त झाल्याच्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत शैक्षणिक संस्थांना द्यावयाचा होता.

लेखापरीक्षेला असे आढळून आले की, राज्य शासनाने राज्य प्रकल्प संचालनालयाला वितरित केलेल्या ₹ 376.97 कोटींच्या (केंद्र आणि राज्य) निधीपैकी ₹ 365.47 कोटी (97 टक्के) निधी वितरित करण्यात तसेच, राज्य प्रकल्प संचालनालयाला प्राप्त झालेल्या ₹ 376.97 कोटी निधीपैकी ₹ 245.56 कोटींचा (56 टक्के) निधी सहभागी उच्च शैक्षणिक संस्थांना वितरित करण्यात विलंब झाला. राज्य प्रकल्प संचालनालयाला आणि सहभागी शैक्षणिक संस्थांना निधी वितरित करण्यात झालेल्या विलंबाचा तपशील **परिशिष्ट 2.1.4** मध्ये दिली आहे आणि **तक्ता 2.1.3** मध्ये सारांशित केला आहे.

---

[2] अंदाजित

[3] अंदाजित

तक्ता 2.1.3: महाराष्ट्र शासन आणि राज्य प्रकल्प संचालनालय यांनी शैक्षणिक संस्थांना वितरीत केलेल्या तील विलंब

वर्ष	राज्य शासनाकडून केंद्र व राज्याचा हिश्श्याचा राज्य प्रकल्प संचालनालयाला वितरित करण्यात झालेला विलंब (विलंब अवधी)	निधीची रक्कम (₹ कोटीत)	राज्य प्रकल्प संचालनालयाकडून संस्थांना वितरित करण्यात झालेला विलंब (विलंब अवधी)	निधीची रक्कम (₹ कोटीत)
2015-16	74 ते 166 दिवस	57.50	10 ते 70 दिवस	57.50
2016-17	55 दिवस	3.00	10 दिवस	3.00
2017-18	12 ते 293 दिवस	95.00	1 ते 137 दिवस	95.00
2018-19	11 ते 63 दिवस	75.30	1 ते 76 दिवस	75.30
2019-20	55 ते 250 दिवस	146.17	5 ते 52 दिवस	146.17
स्रोत: भारत सरकार, महाराष्ट्र शासन आणि राज्य प्रकल्प संचालनालय यांनी मुक्त केल्याचे *आदेश.*				

तक्ता 2.1.3 मध्ये दर्शविल्याप्रमाणे राज्य शासन आणि राज्य प्रकल्प संचालनालय यांच्याकडून निधी मुक्त करण्यात झालेला विलंब एक ते 293 दिवस होता.

शासनाने उत्तरात (डिसेंबर 2021) निधी वितरित करण्यातील विलंबाचा संबंध अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीमध्ये उशिराने जमा झालेला, उशिराने प्राप्त झालेले तपशीलवार प्रकल्प अहवालांचे स्पष्टीकरण, तसेच कोविड-19 याच्याशी लावला.

हे उत्तर स्वीकारार्ह नाही कारण, अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीत निधी मुक्त करण्याची जबाबदारी ही शासनाची असते तर तपशीलवार प्रकल्प अहवालांच्या स्पष्टीकरणातील विलंब हा स्विकृतीपूर्वी तपशीलवार अहवालांची सखोल छाननी न केल्याचे दर्शविते. तसेच, कोविड-19 मुळे झालेला विलंब हा भारत सरकार यांच्याकडून 2019-20 दरम्यान प्राप्त झालेल्या ₹ 87.70 कोटींपैकी फक्त ₹ 6.75 कोटी (मार्च 2020 मध्ये प्राप्त) इतका मर्यादित होता.

2.1.4.4 अपुरी अर्थसंकल्पीय तरतूद

भारत सरकारने 2015-16 दरम्यान केंद्राचा 60 टक्के हिस्सा म्हणून ₹ 34.50 कोटी मंजूर केले. राज्याच्या 40 टक्के हिश्श्यासाठी महाराष्ट्र शासनाने वर्ष 2015-16 च्या अर्थसंकल्पात ₹ 16.44 कोटींची (28.59 टक्के) तरतूद केली होती आणि उर्वरित ₹ 6.65 कोटींची (11.41 टक्के) तरतूद वर्ष 2016-17 च्या अर्थसंकल्पात केली होती. अपुऱ्या तरतुदीच्या परिणामी निधी वितरित करण्यात 153 दिवसांचा विलंब झाला. त्याचप्रमाणे, वर्ष 2017-18 मध्ये भारत सरकारने केंद्राचा 60 टक्के हिस्सा म्हणून ₹ 57 कोटी वितरीत केले याबदल्यात, राज्य शासनाने ₹ 31.38 कोटींची (33.03 टक्के) अर्थसंकल्पात तरतूद केली होती आणि उर्वरित ₹ 6.62 कोटींची (6.97 टक्के) तरतूद वर्ष 2018 -19 मध्ये केली होती. अपुऱ्या तरतुदीच्या परिणामी उच्च शिक्षण संस्थांना निधी वितरित करण्यात 293 दिवसांचा विलंब झाला.

शासनाने उत्तरात (डिसेंबर 2021) अपुऱ्या तरतुदीचा संबंध प्रशासकीय कार्यपद्धतीशी लावला आणि प्रतिपादन केले की यापुढे अनुरूप चा हिस्सा वेळेत वितरित करण्याचे प्रयत्न केले जातील.

2.1.4.5 समर्पित बचत बँक खात्यात न ठेवता इतरत्र ठेवला गेला

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 1.0 मार्गदर्शक तत्त्वात निर्धारित केले होते की राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाचा विखुरलेल्या स्थितीत राहिल्यास त्याचे आर्थिक व्यवस्थापन कमकुवत होईल आणि अंतर्गत नियंत्रणे निकृष्ट होतील, यापासून परावृत्त करण्यासाठी राज्य उच्च शिक्षण परिषद आणि उपभोक्ता संस्था यांनी फक्त एकच समर्पित बचत खाते शेड्यूल बँकेत शक्यतो राष्ट्रीयकृत बँकेत उघडले पाहिजे.

लेखापरीक्षेला असे आढळून आले की चाचणी तपासणी केलेल्या 24 पैकी (न्यू मॉडेल पदवी महाविद्यालय, नंदुरबार अजून कार्यरत व्हायचे आहे) चार उच्च शिक्षण संस्थांनी राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत प्राप्त झालेला समर्पित बचत बँक खात्यात ठेवण्याऐवजी चालु बँक खाते, मुदत ठेवी खाते इत्यादीत ठेवला होता, जे खाली चर्चिले आहे.

- ***शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर***

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूरला "विद्यापीठासाठी पायाभूत सुविधांसाठी अनुदान" या घटकांतर्गत ₹ 20 कोटी प्राप्त (मार्च 2016 आणि मार्च 2019) झाले होते. शिवाजी विद्यापीठाने एक्स-रे फोटो इलेक्ट्रॉनिक स्पेक्ट्रोमीटर विकत घेण्यासाठी त्यातील ₹ 3.26 कोटी पुरवठादाराला पतपत्र जारी कण्यासाठी मुदत ठेव खात्यात हस्तांतरित (जानेवारी 2019) केले. जून 2021 मध्ये सामग्री प्राप्त झाली आणि ₹ 3.11 कोटी पुरवठादाराला अदा करण्यात आले. तथापि, विद्यापीठाने उर्वरित ₹ 25.14 लाख (ठेवीवरील व्याजासहीत) एक वर्षापेक्षा जास्त काळ मुदत ठेव खात्यात ठेवली आणि फक्त ₹ 18.25 लाख राज्य प्रकल्प संचालनालयाला जून 2019 मध्ये हस्तांतरित केले आणि ₹ 6.90 लाख राखून ठेवले.

- ***मुंबई विद्यापीठ***

मुंबई विद्यापीठाला "विद्यापीठांना पायाभूत सुविधांसाठी अनुदान" (राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 1.0) या घटकांतर्गत साधनसामुग्री खरेदी करण्यासाठी ₹ 5.58 कोटीचा निधी प्राप्त झाला (मार्च 2016) होता. लेखापरीक्षेला असे आढळून आले की मुंबई विद्यापीठाने सदर निधी सुरुवातीला राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या समर्पित बचत बँक खात्यात ठेवला होता, परंतु तात्काळ वापरण्यासाठी आवश्यक नसल्याच्या कारणामुळे ₹ 5 कोटी मुदत ठेव खात्यात ठेवली (जून 2016). जुलै 2016 आणि जुलै 2017 या कालावधीत सदर मुदत ठेव वटवली आणि त्यावरील व्याज ₹ 20.44 लाख हे ऑगस्ट 2021 मध्ये राज्य प्रकल्प संचालनालयाला परत केले.

- ***राजाराम महाविद्यालय कोल्हापूर***

"महाविद्यालयांना पायाभूत सुविधांसाठी अनुदान" (राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 1.0) या घटकांतर्गत, राजाराम महाविद्यालय कोल्हापूर यांना ₹ 1.50 कोटी प्राप्त (एप्रिल 2016 आणि डिसेंबर 2017 दरम्यान) झाले. लेखापरीक्षेला असे आढळून आले की राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या मार्गदर्शक तत्त्वांमध्ये परिकल्पित केल्यानुसार हे अनुदान समर्पित बचत बँक खात्यात न ठेवता चालू बँक खात्यात ठेवले होते. मार्च 2021 पर्यंत राजाराम महाविद्यालयाने पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ₹ 1.17 कोटी खर्च केले आणि उर्वरित ₹ 33.24 लाख जुलै 2021 मध्ये राज्य प्रकल्प संचालनालयाला हस्तांतरित केले.

- ***छत्रपती शाहू वाणिज्य शिक्षण आणि संशोधन संस्था, कोल्हापूर***

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 2.0 च्या अंतर्गत "निवडक स्वायत्त महाविद्यालयातील गुणवत्ता आणि उत्कृष्टता वाढविणे" या घटकांतर्गत छत्रपती शाहू वाणिज्य आणि शिक्षण आणि संशोधन संस्था, कोल्हापूर यांना ₹ 3.75 कोटी (डिसेंबर 2018 आणि ऑक्टोबर 2020 दरम्यान) प्राप्त झाले होते. लेखापरीक्षेला असे आढळून आले की या संस्थेने ही रक्कम समर्पित बचत बँक खात्यात न ठेवता चालू खात्यात ठेवली होती.

उत्तरात शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की या चारही संस्थांना समज दिली असून राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याचे संगितले आहे. शासनाने पुढे असेही सांगितले की, नवीन धोरणानुसार राज्य प्रकल्प संचालनालयाने एकल नोडल बँक खाते उघडले आहे आणि अंमलबजावणी अभिकरण म्हणजेच उच्च शिक्षण संस्थांनी शून्य बाकी असलेली दुय्यम खाते उघडलली आहेत, ज्याद्वारे राज्य प्रकल्प संचालनालयाने नेमून दिलेल्या मर्यादेत प्रदाने केली जातात.

या संस्थांनी दीर्घ कालावधीसाठी निधी चालू खाते आणि मुदत ठेव खात्यात ठेवला होता ही वस्तुस्थिती आर्थिक व्यवस्थापन आणि अंतर्गत नियंत्रणे बळकट करण्याचे ध्येय असलेल्या राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या मार्गदर्शक तत्त्वांचे उल्लंघन टाळण्यासाठी राज्य प्रकल्प संचालनालयाकडून अपुरे संनियंत्रण दर्शविते.

2.1.5 योजनेची अंमलबजावणी

योजनेच्या अंमलबजावणीतील अनियमितता/कमतरता पुढील परिच्छेदांमध्ये चर्चिल्या आहेत.

2.1.5.1 महाविद्यालयांचे समूहामध्ये रूपांतर करून विद्यापीठे निर्माण करणे

महाविद्यालयांचे समुहामध्ये रूपांतर करून विद्यापीठ स्थापन करण्यासाठी (घटक क्रमांक 2) राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाने 1.0 आणि 2.0 अंतर्गत प्रति विद्यापीठ ₹ 55 कोटींचा निधी दिला होता. या घटकांतर्गत, ज्या महाविद्यालयांमध्ये पुरेश्या शैक्षणिक, भौतिक आणि तांत्रिक पायाभूत सुविधा उपलब्ध आहेत अशा तीन ते पाच

महाविद्यालयांच्या संसाधनांचे एकत्रीकरण करून विद्यापीठाची निर्मिती करावयाची होती. समुह विद्यापीठांचा उद्देश हा राज्यातील उच्च शिक्षण संस्थांच्या भौगोलिक असमानतेतील गंभीर तफावती दूर करण्याचा आहे. प्रकल्प मंजुरी मंडळाने राज्यात तीन समूह विद्यापीठे[4] निर्माण करण्यास मान्यता (मे 2018 आणि जानेवारी 2019) दिली.

लेखापरीक्षेला असे आढळून आले की जरी कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, साताराला जानेवारी 2019 मध्ये मान्यता देण्यात आली होती तरी हे विद्यापीठ 20 महिन्यांच्या विलंबानंतर, म्हणजे ऑक्टोबर 2021 ला अधिसूचित केले गेले. लेखापरीक्षा छाननीत असे आढळून आले की, महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि राज्य प्रकल्प संचालनालय यांच्यात झालेल्या बैठकीत (जुन 2019) असा निर्णय झाला होता की, विद्यापीठातील प्रस्तावित नवीन पदांच्या खर्चाचा आर्थिक बोजा राज्य शासनावर न टाकता विद्यापीठच करेल. तथापि, विद्यापीठ स्थापनेच्या प्रारूप अधिसूचनेत ही बाब नमूद केली नव्हती. विधी आणि न्याय विभागाने अधिसूचनेची तपासणी करताना असे मत व्यक्त(जुलै 2019) केले की वित्त विभागाची संमती प्राप्त करावी. त्यानंतर महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाकडून, नव्याने निर्माण केलेल्या पदांचा खर्च विद्यापीठ स्वतःच्यातून करेल असे हमीपत्र उशिराने प्राप्त (जानेवारी 2021) केले. त्यानंतर, मंत्रिमंडळाची मान्यता मिळाल्यानंतर, ऑक्टोबर 2021 मध्ये विद्यापीठ अधिसूचित केले गेले.

अशाप्रकारे, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाकडून हमीपत्र घेण्यात आणि नवीन पदांच्या आर्थिक बोजाची बाब प्रारूप अधिसूचनेत नमूद करण्यात अपयशी ठरल्यामुळे विद्यापीठ अधिसूचित होण्यास विलंब झाला. विद्यापीठाला अजूनपर्यंत (डिसेंबर 2021) अनुदान सुद्धा प्राप्त झाले नव्हते.

त्याचप्रमाणे, डॉक्टर होमी भाभा विद्यापीठ, मुंबई आणि हैदराबाद (सिंध) नॅशनल कॉलेजिएट विद्यापीठ मुंबई, अनुक्रमे फेब्रुवारी 2019 आणि ऑक्टोबर 2019 ला अधिसूचित झाले होते. तथापि, भारत सरकारकडून अनुदान प्राप्त न झाल्यामुळे महाराष्ट्र शासनानेही अनुदान प्रदान केले (डिसेंबर 2021) नव्हते.

---

4 (1) डॉ. होमी भाभा विद्यापीठ ((i) विज्ञान संस्था, मुंबई (मुख्य महाविद्यालय), (ii) सिडनहॅम महाविद्यालय, मुंबई, (iii) शासकीय बी. एड. महाविद्यालय मुंबई, आणि (iv) एल्फिन्स्टन महाविद्यालय, मुंबई यांचा समावेश) (2) हैदराबाद (सिंध) राष्ट्रीय कॉलेजिएट विद्यापीठ, मुंबई, ((i) हंसराम रिझुमल वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई, (मुख्य महाविद्यालय), (ii) किशनचंद चेलाराम महाविद्यालय, मुंबई आणि (iii) बॉम्बे शिक्षक प्रशिक्षण महाविद्यालय, मुंबई यांचा समावेश) आणि (3) कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठ, सातारा, ((i) यशवंतराव चव्हाण विज्ञान संस्था, सातारा (मुख्य महाविद्यालय), (ii) धनंजय गाड़गीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा आणि (iii) रयत शिक्षण संस्थेचे छत्रपति शिवाजी महाविद्यालय, सातारा यांचा समावेश)

शासनाने सांगितले की केंद्र शासनाकडून अनुदान प्राप्त न झाल्यामुळे विद्यापीठाला अनुदान प्रदान केले नव्हते, ज्यासाठी राज्य शासन भारत सरकारकडे पाठपुरावा करीत आहे.

2.1.5.2 विद्यमान स्वायत्त महाविद्यालयांचे श्रेणीवर्धन करून विद्यापीठांची निर्मिती करणे

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 2.0 अंतर्गत, सहभागी स्वायत्त महाविद्यालयांना त्यांचे श्रेणीवर्धन विद्यापीठात व्हावे यासाठी त्यांच्या भौतिक पायाभूत सुविधा, शैक्षणिक स्तर आणि नियमन रचना सुधारण्यासाठी ₹ 55 कोटी प्रति संस्था देण्याची तरतूद होती. घटक क्रमांक 1 'विद्यमान स्वायत्त महाविद्यालयांचे श्रेणी वर्धनाद्वारे विद्यापीठात रूपांतर करणे' या घटकांतर्गत अनुदानाची तरतूद केली होती.

लेखापरीक्षेला असे निदर्शनास आले की फर्ग्युसन कॉलेज, पुणे यांचा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, 2016 अंतर्गत फर्ग्युसन राज्य विद्यापीठ, पुणे च्या निर्मितीचा प्रस्ताव, प्रस्तावित विद्यापीठ कृती आराखडा आणि अधिनियम, स्वीकृतीच्या तारखेपासून तीन महिन्याच्या आत सादर करावा या अटीवर प्रकल्प मंजुरी बोर्डाने मंजुरी (मे 2018) दिली. तथापि, महाविद्यालयाच्या व्यवस्थापनाने व्यवस्थापन नियंत्रण गमावण्याची बाब उपस्थित (फेब्रुवारी 2019) केल्यामुळे अंतिम अधिसूचना जारी केली गेली नाही. या बाबीचे निराकारण करण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने पूर्व कुलगुरू, कवयित्रि बहिणाबाई उत्तर मराठवाडा विद्यापीठ, जळगाव यांच्या अधिपत्याखाली एक समिती स्थापन केली ज्यांना एका आठवड्यात शिफारशी सादर करणे आवश्यक होते. तथापि, समितीने शिफारशी सादर केल्या नव्हत्या. अशाप्रकारे, शासनाने भारत सरकार यांच्याकडून ₹ 33 कोटींचा निधी (₹ 55 कोटीच्या 60 टक्के) उपलब्ध करण्याची संधी वाया घालवली.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की फर्ग्युसन कॉलेजने त्यांच्या स्वतःच्या जमिनी बाबतच्या कारणांमुळे/दाव्यांमुळे विद्यापीठात रूपांतर करण्यात रुची दाखविली नाही.

हे उत्तर स्वीकारार्ह नाही, कारण जरी फर्ग्युसन कॉलेजने स्वारस्य दाखविले नसले तरी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन यांच्याकडे स्वारस्य पत्र दिलेल्या इतर 17 संस्थांपैकी एका संस्थेचा प्रस्ताव पाठवू शकले असते.

2.1.5.3 न्यू मॉडेल पदवी महाविद्यालयाची स्थापना

प्रकल्प मंजुरी बोर्डाने राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 2.0 च्या घटक पाच अंतर्गत नंदुरबार येथे न्यू मॉडेल पदवी महाविद्यालयाची स्थापना करण्यासाठी स्वीकृती (मे 2018) दिली. प्रकल्प मंजुरी बोर्डाने 1,800 विद्यार्थी प्रवेश क्षमता (महाराष्ट्र शासनाच्या स्तरावर सुधारित 4,320 विद्यार्थी) असलेल्या तपशीलवार प्रकल्प अहवालास सुद्धा स्वीकृती (जुलै 2018) दिली.

लेखापरीक्षेला असे निदर्शनास आले की राज्य प्रकल्प संचालनालयाने जयहिंद महाविद्यालय, मुंबई यांची न्यू मॉडेल पदवी महाविद्यालयाचे मार्गदर्शक म्हणून निवड

(ऑगस्ट 2020) केली आणि शैक्षणिक, संशोधन उपक्रम, राष्ट्रीय मूल्यांकन आणि मान्यता परिषदेच्या क्रियाकल्पामध्ये सर्वांगीण विकासासाठी सामंजस्य करार कार्यान्वित केला जाणार होता. तथापि, न्यू मॉडेल पदवी महाविद्यालयाच्या शिक्षक आणि विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठीच्या प्रवास खर्चाचा आर्थिक बोजा जय हिंद महाविद्यालय उचलण्यास तयार नसल्यामुळे या दोघांमध्ये सामंजस्य करार आजपर्यंत (सप्टेंबर 2021) कार्यान्वित होऊ शकला नाही. शिवाय, महाविद्यालयीन इमारतीचे बांधकाम पूर्ण (डिसेंबर 2021) झाले नव्हते म्हणून परिकल्पित केल्यानुसार 2019-20 या शैक्षणिक वर्षात कार्यान्वित होऊ शकले नाही.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की महाविद्यालयाच्या स्थळी जाण्यासाठी पोहच रस्ता उपलब्ध नसल्याने आणि कोविड-19 च्या महासाथीमुळे विलंब झाला. पुढे असेही सांगितले की महाविद्यालयाच्या इमारतीचे आणि वसतिगृहाचे अंतर्गत काम प्रगतिपथावर आहे आणि भारत सरकारकडून तिसरा व अंतिम हप्ता उपलब्ध झाल्यास मार्च 2022 पर्यंत काम पूर्ण केले जाईल.

2.1.5.4 संशोधन, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि गुणवत्ता सुधारणा

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 1.0 अंतर्गत सहभागी राज्यांना संशोधन, नाविन्यपूर्ण उपक्रम आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी (घटक क्रमांक आठ) ₹ 120 कोटीचा पुरविण्याची तरतूद होती. प्रत्येक सहभागी राज्याने संशोधन आणि नाविन्यपूर्ण आराखडा तीन भागात म्हणजेच भाग 1-सामाजिक विकास आणि सार्वजनिक धोरण, भाग 2-प्रगत तंत्रज्ञानासाठी संशोधन आणि भाग-3 नाविन्यपूर्ण उपक्रम आणि तंत्रज्ञान हस्तांतरण केंद्राची स्थापना अश्या तीन भागात सादर करणे आवश्यक होते.

महाराष्ट्र शासनाने सात विद्यापीठांसाठी[5] संशोधन आणि नाविन्यपूर्ण उपक्रम स्थापन करण्यासाठी ₹ 120 कोटींचे संशोधन आणि नाविन्यपूर्ण आराखडा सादर (डिसेंबर 2015) केला. तथापि, प्रकल्प मंजुरी मंडळाने फक्त भाग 3 च्या अंमलबजावणीसाठी ₹ 20 कोटी मंजूर (डिसेंबर 2015) केले आणि महाराष्ट्र शासनाला भाग 1 आणि 2 साठी सुधारित प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिले. लेखापरीक्षेला असे निदर्शनास आले की महाराष्ट्र शासनाने आजपर्यंत संशोधन आणि नाविन्यपूर्ण आराखड्याच्या भाग 1 आणि 2 साठी सुधारित प्रस्ताव प्रकल्प मंजुरी बोर्डाला सादर (डिसेंबर 2021) केला नव्हता.

लेखापरीक्षेच्या असेही निदर्शनास आले की, केंद्रशासनाने नऊ विद्यापीठांसाठी[6] संशोधन आणि नावीन्यपूर्ण आराखड्याच्या भाग-3 साठी ₹ 9.18 कोटी वितरीत (डिसेंबर 2015

---

[5] (i) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपुर विद्यापीठ, (ii) स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड (iii) कवयित्रि बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव, (iv) मुंबई विद्यापीठ, मुंबई, (v) रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई, (vi) सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे आणि (vii) शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर

[6] महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाद्वारे केंद्र शासनास प्रस्तावित अतिरिक्त विद्यापीठासाठीचा निधि समाविष्ट

आणि ऑक्टोबर 2018) केले होते, त्यापैकी महाराष्ट्र शासनाने ₹ 15.30 कोटी (केंद्र हिस्सा ₹ 9.18 कोटी आणि राज्य हिस्सा ₹ 6.12 कोटी) नऊ विद्यापीठांना[7] वितरीत (मार्च 2016 आणि डिसेंबर 2018) केले होते.

घटकांतर्गत प्राप्त झालेल्या चाचणी तपासणी केलेल्या दोन संस्थांपैकी एका संस्थेत लेखापरीक्षेला असे आढळून आले की शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांना महाराष्ट्र शासनाने मंजूर केलेल्या ₹ 5.05 कोटी निधिपैकी ₹ 3.79 कोटी वितरीत (मार्च 2016 ते डिसेंबर 2018) केले होते. तथापि, उर्वरित ₹ 1.26 कोटीचा निधी आजपर्यंत (ऑक्टोबर 2021) वितरीत केला नव्हता ज्याच्या परिणामी घटकाच्या अंमलबजावणीत विलंब झाला.

उत्तरात शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की भारत सरकारकडून उर्वरित प्राप्त झाला नाही ज्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. तथापि, संशोधन आणि नाविन्यपूर्ण आराखड्याच्या भाग 1 आणि 2 चा सुधारित प्रस्ताव सादर न करण्याबाबत शासनाने उत्तर दिले नाही.

2.1.5.5 शिक्षक/अध्यापक कर्मचाऱ्यांच्या रिक्त जागा

उच्च शिक्षणातील गुणवत्ता आणि उत्कृष्टता सुनिश्चित करण्यासाठी एक महत्त्वाचा घटक म्हणजे उच्च शिक्षण संस्थांमध्ये पुरेशा प्रमाणात चांगल्या शिक्षक कर्मचाऱ्यांची उपलब्धता.

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शिक्षकांच्या मनुष्यबळाच्या मंजूर पदांपैकी 85 टक्के पदे भरली असली पाहिजेत आणि रिक्त पदे टप्प्याटप्प्यांनी भरणे आवश्यक होते.

तपासणी केलेल्या 21 पैकी 18 उच्च शैक्षणिक संस्था ज्यांची शिक्षक/अध्यापन कर्मचा-र्यांची माहिती उपलब्ध होती त्यामध्ये लेखापरीक्षेला असे आढळून आले की अध्यापन कर्मचा-र्यांचे मनुष्यबळ हे 22 ते 77 टक्के या श्रेणीत होते. अशाप्रकारे, ही महाविद्यालये राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांचे निकष पूर्ण करीत नव्हते. याचा तपशील **परिशिष्ट 2.1.5** मध्ये दिला आहे. शिक्षकांच्या रिक्त पदाचे कारण शिक्षकांच्या नियुक्तीसाठी चाचणी-तपासणी केलेल्या उच्च शैक्षणिक संस्थांनी सादर केलेल्या प्रस्तावांना महाराष्ट्र शासनाच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागाने प्रतिसाद दिला नाही असे दिले गेले.

---

[7] (i) राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, नागपुर विद्यापीठ, (ii) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, (iii) स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ, नांदेड, (iv) श्रीमती नाथीबाई दामोदरदास ठाकरसी विद्यापीठ, मुंबई, (v) पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापुर विद्यापीठ, सोलापुर, (vi) शिवाजी विद्यापीठ कोल्हापुर, (vii) कवयित्रि बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगांव, (viii) सावित्रीबाई फुले विद्यापीठ, पुणे, (ix) रसायन तंत्रज्ञान संस्था, मुंबई

उत्तरात शासनाने सांगितले की प्राध्यापकांची सरासरी संख्या 66.2 टक्के आहे व नोव्हेंबर 2021 मध्ये घेतलेल्या शासन निर्णयानुसार प्राध्यापकांच्या 2,088 जागा भरण्याचा निर्णय घेतला आहे.

2.1.6 संनियंत्रण आणि मूल्यांकन

राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानांतर्गत संनियंत्रण आणि मूल्यांकनाची त्रिस्तरीय पद्धत आहे. राष्ट्रीय स्तरावर, प्रकल्पाचे वार्षिक पुनर्विलोकन करण्यासाठी मानव संसाधन विकास मंत्रालयामधील प्रकल्प मूल्यांकन मंडळ जबाबदार असते. राज्यस्तरावर, राज्य शासनाने नियमितपणे संस्थेचे संनियंत्रण आणि मूल्यांकन करावयाचे होते. शिवाय निश्चित प्रमुख कामगिरी निर्देशकांच्या तुलनेत संस्थांच्या प्रगतीचे संनियंत्रण आणि मूल्यांकन करण्यास तसेच त्रैमासिक बैठक घेण्यास राज्य उच्च शिक्षण परिषद जबाबदार आहे. संस्थांत्मक पातळीवर संस्थेच्या प्रगतीवर संनियंत्रण करण्यासाठी संचालक मंडळ जबाबदार होते आणि प्रकल्पांची अंमलबजावणी आणि संस्थेची कामगिरी सुधारण्यासाठी प्रशासक मंडळाने मार्गदर्शन करावयाचे होते.

लेखापरीक्षेला असे निदर्शनास आले की राज्य उच्च शिक्षण परिषदेने ऑक्टोबर 2021 पर्यंत प्रमुख कामगिरी निर्देशक अंतिम केले नव्हते. पुढे असेही लक्षात आले की, राज्य उच्च शिक्षण परिषदेने गठित झाल्यापासून आत्तापर्यंत (जुलै 2021) फक्त चार बैठका घेतल्या होत्या.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की, मार्च 2022 पर्यंत प्रमुख कामगिरी निर्देशक अंतिम केले जातील आणि संनियंत्रण मजबुत करणासाठी राज्य उच्च शिक्षण परिषदेच्या बैठकांची पूरेशी वारंवारिता सुनिश्चित केली जाईल.

2.1.7 निष्कर्ष

महाराष्ट्रात राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाची अंमलबजावणी संथ आणि अप्रभावी नियंत्रणांनी भरलेली होती. एकूण ₹ 376.97 कोटी (केंद्र व राज्य शासन) अनुदानाच्या तुलनेत राज्य शासन फक्त ₹ 283.07 कोटी खर्च करू शकले व ₹ 93.90 कोटी अखर्चित राहिले. शासनाने ऑक्टोबर 2013 मध्ये राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाच्या अंमलबजावणीत सहभागी व्हायचे ठरविले होते. तथापि, राज्य उच्च शिक्षण परिषद जी उच्च शिक्षणातील सर्वसमावेशक दीर्घकालीन आणि उच्च शिक्षण आराखडा विकसित करणारी सर्वोच्च धोरणात्मक संस्था आहे तिचे गठण ऑगस्ट 2017 मध्ये झाले. परिणामी, शासनाने वर्ष 2014-17 च्या ऐवजी वर्ष 2015-17 साठीचा राज्य उच्च शिक्षण आराखडा सादर केला. तसेच, राज्याच्या स्थूल राज्य उत्पन्नाच्या दोन टक्क्यांपेक्षा कमी रक्कम उच्च शिक्षणावर खर्च केली होती. समुह महाविद्यालयांचे विद्यापीठात रूपांतर करण्यास विलंब झाला. राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियानाचे संनियंत्रण आणि मूल्यांकन कमकुवत होते कारण सहभागी उच्च शिक्षण संस्थांची कामगिरी तपासण्यासाठी प्रमुख कामगिरी निर्देशक राज्य उच्च शिक्षण परिषदेकडून अंतिम केले गेले नव्हते.

2.1.8 शिफारसी

शासनाने सुनिश्चिती करावी की,

- भारत सरकार बरोबर झालेल्या सामंजस्य कराराप्रमाणे उच्च शिक्षणावर स्थूल राज्य उत्पन्नाच्या दोन टक्क्यांपर्यंत खर्च करावा.
- राष्ट्रीय उच्चतर शिक्षा अभियान 1.0 आणि 2.0 अंतर्गत लक्ष्यित फायदे मिळण्यासाठी प्रकल्प कालबद्ध रीतीने पूर्ण करावे.
- राज्यात उच्च शिक्षणाच्या उत्तम संनियंत्रण आणि मुल्यांकन यासाठी प्रमुख कामगिरी निर्देशक कालमर्यादेत तयार करावेत

नगर विकास विभाग

बृहन्मुंबई महानगर पालिका

2.2. महानगरपालिकेच्या मंडयांचा वापर आणि पुनर्विकास

2.2.1 प्रस्तावना

मुंबई महानगरपालिका अधिनियम,1888 च्या कलम 61(एच) अन्वये बृहन्मुंबई महानगरपालिका फळे, भाजीपाला, मांस ईत्यादिच्या विक्रीसाठी सार्वजनिक मंडयांचे बांधकाम, देखरेख आणि नियमन करते. फेब्रुवारी 2021 पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे 195 महानगरपालिका मंडया[8] होत्या. मंडयांचा वापर आणि पुनर्विकास आणि गाळे धारकांकडून विविध शुल्क वसुलीचे निर्धारण करण्यासाठी लेखापरीक्षेने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाजार विभागाच्या अभिलेख्यांची तपासणी केली (जानेवारी 2021 व फेब्रुवारी 2021).

लेखापरीक्षा निष्पत्ति खालील परिच्छेदात चर्चिले आहेत.

लेखापरीक्षा निष्पत्ति

2.2.2 मंडयांचा वापर

2.2.2 समावेशक आरक्षण (ॲकोमोडेशन रिझर्वेशन) योजनांतर्गत मंडयांचा वापर

समावेशक आरक्षण योजनेंतर्गत मंडयांसाठी राखीव भूखंड खासगी विकासकांकडून विकसित केले जातात आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेला विनामूल्य सुपूर्द केले जातात, ज्यासाठी विकासकाला प्रोत्साहनपर चटई क्षेत्र निर्देशांक मंजूर केला जातो. ह्या योजनेंतर्गत 103 मंडया घेण्यात आल्या होत्या. ह्या 103 मंडयांच्या वापराची स्थिति **तक्ता 2.2.1** मध्ये दिली आहे.

[8] समावेशक आरक्षण:103; विद्यमान मंडया 92; एकूण 195 मंडया

तक्ता 2.2.1: समावेशक आरक्षण योजनांतर्गत मंडयांच्या वापराची स्थिती

अ क्र	वापराची स्थिती	मंडईचे क्षेत्रफळ (लाख चौरस फुटामध्ये)	टक्केवारी	मंडयांची संख्या
1	प्रकल्पबाधित व्यक्तींना वाटप (कोणत्याही प्रकल्पाच्या अंमलबजावणीमुळे आणि ताब्यात घेतल्यामुळे ज्यांच्या व्यावसायिक आस्थापना प्रभावित झाल्या)	1.45	17.77	81
2	भाडेतत्त्वावर खासगी अभिकरणांना वाटप	1.44	17.65	
	बाजार सेवांसाठी वाटप केलेले नाही आणि रिक्त			
3	शासकीय विभागांना[9] वाटप केले	1.81	22.18	13
4	प्रकल्पबाधित व्यक्तींना वाटप केले परंतु त्यांनी ताबा न घेतल्याने रिक्त	1.64	20.10	53
5	सामायिक क्षेत्र: जोडमार्ग (पॅसेज), शौचालये, बाजार निरीक्षक कार्यालय	1.7	20.83	--
6	सर्व 103 मंडयांमध्ये वाटपासाठी उपलब्ध निव्वळ क्षेत्रफळ	0.12	1.47	--
	एकूण	**8.16**	**100**	**147**
	वजा -एका मंडईमध्ये प्रकल्पबाधित व्यक्ती, भाडेतत्त्वावरील खासगी अभिकरणे, शासकीय विभाग यांना वाटप केलेले क्षेत्र असू शकते. त्यामुळे परस्परव्यापी क्षेत्र असलेल्या मंडयांची संख्या कमी केली आहे.			**(-)44**
समावेशक आरक्षणांतर्गत एकूण मंडया				**103**

तक्ता 2.2.1 मध्ये दर्शविल्याप्रमाणे, 21.57 टक्के (तक्ता 2.2.1 चे अनुक्रमांक 4 आणि 6) मंडई क्षेत्र रिक्त होते, त्यापैकी 20.10 टक्के मंडई क्षेत्र जरी प्रकल्पबाधित व्यक्तींना वाटप केले होते, तरी व्यवसायाच्या दृष्टीने पहिल्या व दुसऱ्या मजल्यावरील जागा सोयीची नसल्याच्या कारणावरुन प्रकल्पबाधित व्यक्तींनी त्या ताब्यात घेतल्या नव्हत्या. शिवाय, मंडईचे 22.18 टक्के क्षेत्र शासकीय विभाग आणि स्वायत्त संस्थांना वाटप केले होते आणि अशाप्रकारे बाजार सेवांव्यतिरिक्त इतर कारणांसाठी ते वापरले जात होते.

अशाप्रकारे, डिसेंबर 2021 पर्यंत मंडई इमारतीचे 43.75 टक्के(तक्ता 2.2.1 चे अनुक्रमांक 3,4 आणि 6) क्षेत्र एकतर मंडई सेवांसाठी वापरले गेले नाही किंवा रिकामे पडून राहिले.

- ***भाडेपट्टा करारातील अटींचे पालन न करणे***

103 मंडयांपैकी नऊ मंडया खासगी अभिकरणांना व्यवस्थापन आणि देखभालीसाठी महापालिका किरकोळ मंडई म्हणून भाडेतत्त्वावर देण्यात आल्या होत्या, त्यापैकी लेखापरीक्षेने तीन मंडयांची पडताळणी केली. पट्टेदार आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यातील करारानुसार, पट्टेदाराला गाळे/दुकाने/परिसर हे व्यक्ति/संस्था/कॉर्पोरेट संस्था

[9] निवडणूक विभाग, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, बृहन्मुंबई महानगरपालिकेचा बाजार विभाग आणि इतर

किंवा कोणत्याही इतर संस्था यांना विशिष्ट बाजार सेवा वाटप करण्याची परवानगी होती. संयुक्त पाहणी व अभिलेख्यांच्या चाचणी-तपासणीत **तक्ता 2.2.2** मध्ये दर्शविल्याप्रमाणे भाडेपट्टा करारातील अटींचा भंग केल्याचे दिसून आले.

तक्ता 2.2.2 : भाडेपट्टा करारांच्या अटींचे पालन न करणे

मंडईचे ठिकाण व वाटपाची तारीख	लेखापरीक्षा निष्पत्ती
कोपरी, पवई (एप्रिल, 2002)	भाडेतत्वावरील करारानुसार 10 टक्के मंडई क्षेत्र शेतीमाल विक्रीसाठी राखीव ठेवण्यात आले नव्हते आणि मंडईत अनधिकृत कामे केली होती त्यामुळे अतिरिक्त महापालिका आयुक्त (पूर्व उपनगरे) यांनी करार रद्द (सप्टेंबर 2007) केला आणि भाडेपट्टेदाराला जागा रिकामी करण्याचे निर्देश दिले. तथापि, भाडेपट्टेदाराने जागा रिकामी केली नव्हती.
 अनधिकृत काम	
 मद्याचा बार व हॉटेल	ऑगस्ट 2017 मध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेल्या तपासणीमध्ये एक मद्याचा बार आणि एक मद्य पुरवणारे हॉटेल सुरू असल्याचे उघड झाले. जरी, सहायक आयुक्त (बाजार) यांनी सहायक अभियंता (बाजार) यांना पोलीस संरक्षणात जागेचा जबरदस्तीने ताबा घेण्याचे निर्देश दिले होते, तरी सहायक अभियंता (बाजार) यांनी केलेल्या कारवाईचे अभिलेख उपलब्ध नव्हते आणि भाडेपट्टेदाराने जागेचा वापर सुरूच ठेवला. लेखापरीक्षेने केलेल्या संयुक्त पाहणीमध्ये (फेब्रुवारी 2021) भाडेपट्टा कराराचा भंग सुरूच असल्याचे दिसून आले. उत्तरात महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने सांगितले (डिसेंबर 2021) की भाडेपट्टेदाराने समाप्ती पत्राला न्यायालयात आव्हान दिले आहे.

कोंडीविटा, अंधेरी (ऑगस्ट 2013)  पार्ट्यांसाठी/अल्पोपहारासाठी गच्चीचा वापर	बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय परिसराच्या रचनेत बदल, पार्टी/उपहारगृहासाठी गच्चीचा वापर, मोकळ्या जागेत उद्वाहनाची उभारणी आणि शेतमालाच्या विक्रीसाठी मंडईचे 10 टक्के आरक्षण न ठेवणे यासाठी त्यांना कारणे दाखवा नोटिस जारी करण्यात (मे 2017) आली, जारी ₹ 3.25 लाखांची दंड वसुली करण्यात आली (ऑक्टोबर 2017) तरी न पट्टेदाराने उल्लंघनाची चूक सुधारली ना बृहन्मुंबई महानगरपालिकेने त्यानंतर कोणतीही कारवाई केली नाही. लेखापरीक्षेने केलेल्या संयुक्त पाहणीमध्ये (जानेवारी 2021) असे उघड झाले की भाडेपट्टा कराराचे उल्लंघन करून इमारतीचा दूसरा मजला बँक्वेट हॉल म्हणून वापरला जात होता. उत्तरात विभागाने सांगितले (डिसेंबर 2021) की 10 टक्के क्षेत्राचा. नॉन-मार्केटेबल वस्तूंचा वापर केल्याबद्दल दंड आकारण्यात आला होता आणि पट्टेदाराने केलेल्या उल्लंघनात सुधारणा करून सर्व अटींची पूर्तता करण्यात आली होती.
वालनाई, मालाड (फेब्रुवारी 2002)	अनधिकृत फेरफार/अतिरिक्त कामे आणि भाडेपट्टा कराराचे उल्लंघन करून दुसऱ्या मजल्याचा बँक्वेट हॉल म्हणून वापर यासाठी दोन नोटिसा जारी (सप्टेंबर 2014 आणि फेब्रुवारी 2015) करण्यात आल्या. समाप्तीचे पत्र सप्टेंबर, 2017 मध्ये जारी करण्यात आले, परंतु लेखापरीक्षेने केलेल्या संयुक्त भेटीत (जानेवारी 2021) जागेचा ताबा पट्टेदाराकडेच असल्याचे उघड झाले. उत्तरात विभागाने सांगितले (डिसेंबर 2021) की अनधिकृत फेरफार/अतिरिक्त कामे काढून टाकण्यात आली आहेत आणि पट्टेदाराने नोटिस रद्द करण्याची आणि भाडे स्विकारण्याची विनंती केली आहे, ज्यावर प्रक्रिया सुरू आहे.
स्रोत: बाजार विभागाच्या अभिलेख्यांची तपासणी आणि लेखापरीक्षेने केलेले संयुक्त निरीक्षण	

वरील तीनही प्रकरणांमध्ये जरी कराराचा भंग केल्याबद्दल नोटिसा जारी करण्यात आल्या होत्या तरी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या बाजार विभागाकडून करारातील अटींचा भंग केल्याप्रकरणी वेळेवर कारवाई करण्यात विलंब झाला.

2.2.2.2 बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे बांधलेल्या मंडयांचा उपयोग/वापर

डिसेंबर 2021 पर्यंत बृहन्मुंबई महानगरपालिकेने 92 मंडया बांधल्या आहेत, ज्यापैकी 62 मंडयांतील अस्तित्वात असलेल्या 11,351 दुकाने/गाळ्यांपैकी 10,848(96 टक्के) गाळे वापरात आहेत. उर्वरित 30 मंडयांचा पुनर्विकास सुरू होता.

अंधेरी(पूर्व) येथे तळ मजला अधिक दहा मजल्यांचा समावेश असलेली नवीन मंडई[10] जुलै 2014 मध्ये बांधकाम झाल्यापासून विनावापर पडून होती. बाजार विभागाने

[10] हिंदू हृदयसम्राट श्री बाळासाहेब ठाकरे मंडई असे नामकरण केले आहे

इमारत भाड्याने देण्यासाठी पाच वेळा (मे 2016 आणि सप्टेंबर 2018 दरम्यान) निविदा मागवल्या होत्या, परंतु चार निविदांमध्ये कोणताही प्रतिसाद मिळाला नव्हता आणि पाचव्या निविदेमध्ये प्राप्त झालेली बोली भाड्याच्या अंदाजापेक्षा खूपच कमी होती. लेखापरीक्षेने केलेल्या संयुक्त पाहणीत (जानेवारी 2021) असे आढळून आले की मंडई इमारतीच्या तळ ते पाचव्या मजल्याचा वापर कोविड विलगीकरण केंद्र म्हणून केला जात होता आणि सहा ते नवव्या मजल्यांचा वापर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारती प्रस्ताव विभागातर्फे केला जात होता.

अशाप्रकारे, सहा वर्षांहून अधिक काळ मंडईच्या इमारतीचा वापर बाजार सेवांसाठी झाला नाही.

उत्तरात विभागाने सांगितले (डिसेंबर 2021) की जून 2018 पासून मजला-निहाय निविदा मागवण्यात आल्या होत्या आणि मार्च 2020 मध्ये तळ मजल्यापासून पाचवा मजला आणि दहावा मजला, दोन पक्षकारांना वाटप करण्यात आले होते. पुढे असे सांगण्यात आले की एका पक्षकाराला दिलेला तळ ते पाचवा मजला बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोविड विलगीकरण केंद्रासाठी एप्रिल 2020 ते डिसेंबर 2021 पर्यंत ताब्यात घेतला आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेने पक्षकारांना त्यांच्या संबंधित जागेचा प्रत्यक्ष ताबा घेण्याचे निर्देश (डिसेंबर 2021) दिले आहेत.

2.2.3 विद्यमान महापालिका मंडयांचा पुनर्विकास

नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी विद्यमान महापालिका किरकोळ मंडयांच्या पुनर्विकासासाठी मार्गदर्शक तत्त्वे जारी (फेब्रुवारी 2004 आणि मे 2005) केली. मार्गदर्शक तत्त्वांनुसार, विक्रेते/विकासकांची संघटना मोडकळीस आलेल्या मंडयांच्या पुनर्विकासासाठी पुनर्विकास प्रस्तावासह बाजार विभागाशी संपर्क साधते. मंजुरी मिळाल्यावर, बाजार विभागाकडून विकासकाला मंडईची पुनर्बांधणी करण्यासाठी आणि विद्यमान परवानाधारकांचे पुनर्वसन करण्यासाठी उद्देशपत्र (लेटर ऑफ इंडेंट) जारी केले जाते, ज्याच्या बदल्यात विकासकाला प्रोत्साहन क्षेत्र मंजूर केले जाते, उद्देशपत्रानुसार, उद्देशपत्र जारी केल्यापासुन 36 महिन्यांच्या आत पुनर्विकास होणे आवश्यक आहे. बृहन्मुंबई महानगरपालिकेचा इमारती प्रस्ताव विभाग इंटीमेशन ऑफ डिसअप्रुवल[11] जारी करतो ज्याचे अनुपालन विकासकाने बांधकामासाठी प्रारंभ प्रमाणपत्र (कमेंसमेंट सर्टिफिकेट) जारी होण्यापूर्वी करावयाचे असते.

पुनर्विकासासाठी घेतलेल्या 30 पैकी 23 मंडयांच्या अभिलेख्यांच्या चाचणी-तपासणीत असे दिसून आले की फेब्रुवारी 2006 ते जुलै 2010 दरम्यान 18 प्रकल्पांना आणि मार्च आणि एप्रिल 2017 मध्ये पाच प्रकल्पांना उद्देशपत्रे जारी करण्यात आली होती. डिसेंबर 2021 पर्यंत या 23 मंडयांच्या पुनर्विकासाची स्थिति खाली चर्चिली आहे:

[11] इंटीमेशन ऑफ डिसअप्रुवल मध्ये विकासकाने अनुपालन करावयाच्या विविध अटी व शर्ती उद्धृत असतात. ज्यानंतर प्रारंभ प्रमाणपत्र जारी केले जाते

- केवळ पाच[12] प्रकल्पांचा पुनर्विकास करण्यात आला आणि विद्यमान परवानाधारकांचे एप्रिल 2011 ते जानेवारी 2021 दरम्यान पुनर्वसन करण्यात आले.
- पाच प्रकल्पांमध्ये[13] विकासकांना विद्यमान परवानाधारकांकडून ना-हरकत प्रमाणपत्र न मिळाल्याने आवश्यक इमारतीसाठी विद्यमान परवानाधारकांनी जागा रिकामी न केल्याने, मोकळ्या जागेची अनुपलब्धता आणि आराखड्याला मंजुरी न मिळाल्याने इंटीमेशन ऑफ डिसअप्रुवल जारी करण्यात आले नाही. बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे मंडईचा पुनर्विकास स्वतः करण्याच्या प्रस्तावासह नोव्हेंबर 2016 ते मे 2018 दरम्यान या प्रकल्पांची उद्देशपत्रे रद्द करण्यात आली.

उत्तरात विभागाने सांगितले (डिसेंबर 2021) की वर उल्लेख केलेल्या पाच रद्द केलेल्या प्रकल्पांपैकी बृहन्मुंबई महानगरपालिकेने दोन प्रकल्पांच्या[14] दुरुस्तीचे काम हाती घेण्याचा प्रस्ताव ठेवला होता आणि उर्वरित तीन प्रकल्प[15] स्वत: पुनर्विकसित करण्याचे प्रस्तावित होते, ज्यासाठी महानगरपालिका/संरचना सल्लागारांद्वारे योजना तयार केल्या जात होत्या.

- एक प्रकल्प म्हणजेच जी एम.जी केला मंडई, यामध्ये जरी उद्देशपत्र ऑक्टोबर 2018 पर्यंत वाढवले होते तरी विकासक इंटीमेशन ऑफ डिसअप्रुवल मिळवण्यात अपयशी ठरला. याचे मुख्य कारण हे होते की क्षेत्रामधे बदल झाल्यामुळे बांधकाम इमारती प्रस्ताव विभागाची नवीन मंजुरी घेणे आवश्यक होते. उत्तरात विभागाने सांगितले (डिसेंबर 2021) की उद्देशपत्राची मुदत मार्च 2022 पर्यंत वाढवण्यात आली आहे.
- दोन प्रकल्प म्हणजेच संत गाडगे महाराज मंडई आणि जी.एल. पाटील मंडई यामध्ये जरी उद्देशपत्र 2009 मध्ये जारी केले होते तरी रेल्वेकडून ना-हरकत प्रमाणपत्र, भारतीय पुरातत्त्व विभागाकडून ना-हरकत प्रमाणपत्र मिळण्यास विलंब झाल्याने आणि पर्यावरण मंजुरी मिळण्यास विलंब झाल्याने विकासकांनी इंटीमेशन ऑफ डिसअप्रुवल अनुक्रमे मे 2017 व जानेवरी 2018 मध्ये प्राप्त केली.

तथापि या दोन्ही मंडयांचा पुनर्विकास पूर्ण झाला नाही.(डिसेंबर, 2021).

- पाच प्रकल्पांमध्ये[16] जरी बांधकामासाठी प्रारंभ प्रमाणपत्रे नोव्हेंबर 2010 ते मे 2017 दरम्यान जारी करण्यात आली होते तरी, बांधकाम पूर्ण झाले नव्हते

---

12 (i) संत जलाराम बाप्पा मंडई (ii) पंत नगर मंडई, (iii) वाकोला मंडई, (iv) बी.आर. गावडे मंडई, आणि (v) पाली मंडई, (जानेवारी 2021 मध्ये पुनर्वसित)

13 (i) खेरवाडी मंडई, (ii) बी.एच. चेंबुरकर मंडई, (iii) मुलुंड पूर्व मंडई, (iv) गोपी टँक मंडई, आणि (v) एम.एच. मांजरेकर मंडई

14 (i) मुलुंड पूर्व मंडई आणि (ii) गोपी टँक मंडई

15 (i) खेरवाडी मंडई, (ii) एम.एच. मांजरेकर मंडई आणि (iii) बी.एच. चेंबुरकर मंडई

16 (i) टिळकनगर मंडई, (ii) डॉ. बी.ए.मंडई, (iii) कालिना मंडई, (iv) हिराचंद मंडई आणि (v) पार्क साईट विक्रोळी मंडई

(डिसेंबर 2021). विद्यमान शौचालये, दुकाने पाडण्यास विलंब, भारतीय विमानतळ प्राधिकरणाकडून ना-हरकत प्रमाणपत्र न मिळणे आणि बृहन्मुंबईसाठी विकास नियंत्रण आणि प्रोत्साहन अधिनियम, 2034 मधील आरक्षण बदल अश्या विविध कारणांमुळे विलंब झाला. लेखापरीक्षेला असेही आढळून आले की बांधकाम पूर्ण होण्यास विलंब झाल्यास दंड आकारण्याची कोणतीही तरतूद उद्देशपत्र/इंटीमेशन ऑफ डिसअप्रुवल यामध्ये नव्हती.

उत्तरात विभागाने सांगितले की (डिसेंबर 2021) पुनर्वसनाचा भाग तीन मंडयांमध्ये[17] पूर्ण झाला आहे आणि अंशतः ताबा प्रमाणपत्र प्रतिक्षित आहे. उर्वरित दोन मंडयांमध्ये काम प्रगतिपथावर आहे.

- पाच प्रकल्पांमध्ये[18] ज्यासाठी मार्च व एप्रिल 2017 मध्ये उद्देशपत्रे जारी केली होती, मंडयांच्या पुनर्विकासासाठी विकासकाकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांना मंजुरी देण्यासाठी विकास नियंत्रण व प्रोत्साहन अधिनियमात तरतूद नसल्याने बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इमारती प्रस्ताव विभागाने योजनांवर प्रक्रिया/मंजूर केली नाही. नियम 33(21) मध्ये सुधारणा करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे धोरणविषयक प्रस्ताव सादर (डिसेंबर, 2020) करण्यात आला होता.

उत्तरात विभागाने सांगितले (डिसेंबर 2021) की विद्यमान नियम क्र. 33(21)मध्ये उपनियम (सी) समाविष्ट करून सदर विनियम सुधारित करण्यात आला होता (एप्रिल,2021). पुढे संगितले की विकासकाकडून प्राप्त झालेले प्रस्ताव सुधारित नियम क्र. 33(21) (सी) अंतर्गत प्रक्रिया केले जातील. पुढे, असेही सांगण्यात आले की, सुधारित उद्देशपत्रांसाठीच्या प्रस्तावांवर गुणवत्तेनुसार नवीन मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रक्रिया केली जाईल.

अशाप्रकारे, चाचणी-तपासणी केलेल्या 23 मंडयांपैकी, गेल्या 15 वर्षांमध्ये केवळ पाच (22 टक्के) मंडयांचा पुनर्विकास करण्यात आला, जे विद्यमान मोडकळीस आलेल्या मंडयांच्या पुनर्विकासात आणि दुकान मालकांच्या पुनर्वसनात संथ प्रगती दर्शविते.

2.2.4 शुल्क वसुलीतील अनियमितता

बृहन्मुंबई महानगरपालिकेने बांधलेल्या मंडयांतील दुकाने, स्टॉल, जागा आणि कक्ष हे व्यावसायिक कारणांसाठी परवानाधारकांना दिलेले जातात. मुंबई महानगरपालिका अधिनियम,1888 च्या कलम 407 नुसार महापालिका मंडयांमधील दुकानांचे परवानाधारक/काळजीवाहक यांच्याकडून वस्तूंच्या[19] विक्रीसाठी जसे की विक्रीयोग्य

---

[17] (i) टिळकनगर मंडई, (ii) कालिना मंडई, (iii) हिराचंद देसाई मंडई

[18] (i) सांताक्रूझ मंडई, (ii) अण्णासाहेब वर्तक मंडई, (iii) आचार्य आत्मारामभाऊ लाड मंडई, (iv) समर्थ रामदास मंडई आणि (v) व्ही. एल. वागधरे मंडई

[19] मार्केटेबल वस्तु: तृणधान्ये, कडधान्ये, भाजीपाला, मांस, मसाले आणि पशुखाद्य इ.
नॉन-मार्केटेबल वस्तु: डिपार्टमेंटल स्टोअर, तयार कपडे/वस्त्रे, विविध वस्तु, हार्डवेअर, रोगनिदान विषयक प्रयोगशाळा इ.

(मार्केटबल) आणि गैर-विक्रीयोग्य (नॉन मार्केटेबल) असणाऱ्या वस्तूंवर विक्री-केंद्र (स्टॉलेज) शुल्क वसूल केले जाते.

शिवाय, मुंबई महानगरपालिका अधिनियम,1888 च्या कलम 368(5) नुसार प्रत्येक व्यापार परिसरातील मालकांकडून किंवा दुकानांच्या ताबेदारांकडून दररोज किंवा वेळोवेळी संकलित केलेले व्यवसायविशिष्ट कचरा शुल्क[20] जमा करण्यासाठी आयुक्तांची परवानगी घेणे बंधनकारक आहे. आयुक्तांनी अशी परवानगी दिल्यावर आयुक्त दरवेळी, तात्पुरते व्यवसायविशिष्ट (ट्रेड रिफ्यूज) शुल्क जमा करण्यास कळवतील त्यानुसार अर्जदाराला अशा शुल्काच्या प्रदानानुसार व्यवसायविशिष्ट कचरा शुल्क जमा करण्याची परवानगी दिली जाते.

अभिलेख्यांच्या चाचणी तपासणीत पुढील बाबी समोर आल्या:

2.2.4.1 विक्री-केंद्र (स्टॉलेज) शुल्काची कमी वसुली

- मालाडच्या वळणाई मंडईमध्ये, कराराचा भंग करून संपूर्ण मंडई क्षेत्राऐवजी 70 टक्के मंडई क्षेत्रावर (सामायिक शौचालये, जीना, उद्वाहन इ. वगळून) काळजीवाहकांकडून विक्री-केंद्र शुल्क वसूल करण्यात आले. यामुळे फेब्रुवारी 2002 ते जानेवारी 2021 दरम्यान ₹ 1.46 कोटींची कमी वसूली झाली.

उत्तरात विभागाने सांगितले (डिसेंबर 2021) की सक्षम प्राधिकाऱ्यांनी मंजूर केल्यानुसार बांधलेल्या क्षेत्राच्या 70 टक्के क्षेत्रावर विक्री-केंद्र शुल्क आकारले व संकलित केले जात होते. उत्तर समर्थनीय नाही कारण 70 टक्के बाजारक्षेत्रावर विक्री-केंद्र शुल्क आकारणे हे भाडेपट्टा कराराच्या खंड 11 चे उल्लंघन करत होते.

- गोरेगाव येथील यशोधाम मंडई (गोकुळधाम मंडई) मधील संपूर्ण पहिला मजला (3,085 चौ.फु.) हा परवानाधारकांना देण्यात आला (एप्रिल 2001) होता. तथापि, बाजार विभागाने मासिक विक्री-केंद्र शुल्क स्वेच्छेनुसार ₹ 26,994 प्रति माह निश्चित केले आणि ₹ 38,563 प्रति माह (3,085 चौ.फु. X 12.50[21]) च्या तुलनेत ₹ 30,850 प्रति माह (नोव्हेंबर 2006 पासून @ ₹ 10.00 प्रति चौ.फु.) असे सुधारित केले. यामुळे एप्रिल 2001 ते जानेवारी 2021 या कालावधीत ₹ 20.94 लाख विक्री-केंद्र शुल्काची कमी वसुली झाली.

  उत्तरात विभागाने सांगितले (डिसेंबर 2021) की थकीत विक्री-केंद्र शुल्क तपासून वसूल केले जाईल.

- 12 प्रभागांमध्ये एप्रिल 2017 ते डिसेंबर 2020 या कालावधीसाठी ₹ 1.84 कोटी विक्री-केंद्र शुल्काची वसुली प्रलंबित होती.
- स्टॉल्स/दुकानांची संख्या सारखी होती आणि दर बदललेले नसूनही वसुलीयोग्य विक्री-केंद्र शुल्क म्हणून दाखवलेल्या किमतीत बरीच तफावत होती. 'पी-उत्तर' प्रभागात 2017-18,

---

[20] व्यवसायविशिष्ट कचरा शुल्क मध्ये मटण, बिफ, डुकराचे मांस इ चा समावेश होतो

[21] मार्केटेबल वस्तुंसाठी (शेती उत्पादन) @ ₹ 9 प्रति.चौ.फु दराने आणि नॉन-मार्केटेबल वस्तुंसाठी @ ₹ 12.50 प्रति.चौ.फु दराने विक्री-केंद्र शुल्क वसूल केले जाते

2018-19 आणि 2019-20 दरम्यान वसुलीयोग्य रक्कम अनुक्रमे ₹ 18.97 लाख, ₹ 36.25 लाख आणि ₹ 56.75 लाख दर्शविली होती, तरी 2017-20 दरम्यान स्टॉल्स/दुकानांची संख्या (586) समान राहिली. त्याचप्रमाणे, 'टी' प्रभागात 2017-18, 2018-19 आणि 2019-20 दरम्यान वसुलीयोग्य रक्कम अनुक्रमे ₹ 28.94 लाख, ₹ 39.69 लाख आणि ₹ 48.50 लाख दर्शविली होती तरी त्याच कालावधीत स्टॉल्स/दुकानांची संख्या 228 राहिली. हे शुल्काचे निर्धारण आणि अभिलेख ठेवण्याची पद्धत अयोग्य असल्याचे दर्शविते.

उत्तरात विभागाने सांगितले (डिसेंबर 2021) की सर्व 24 प्रभागांतील थकीत विक्री-केंद्र शुल्काचे संकलन केले जात आहे.

2.2.4.2 व्यवसायविशिष्ट कचरा (ट्रेड रेफ्यूज) शुल्काची थकीत वसुली

1999 पासून व्यवसायविशिष्ट कचरा (ट्रेड रेफ्यूज) शुल्काच्या वसुलीचे योग्यरित्या दस्तऐवजीकरण झालेले नाही आणि बाजार विभागाकडून त्याचे योग्य परीक्षण केलेले नाही. व्यवसायविशिष्ट कचरा शुल्काची मागणी नोंदवही ठेवली गेली नव्हती आणि बाजार विभाग 1999 व्यवसायविशिष्ट कचरा शुल्काच्या वसूलीचे वास्तविक लेखापरीक्षित विवरण सादर करू शकला नाही आणि आजच्या तारखेपर्यंत रक्कम थकीत आहे. बाजार विभागाने महानगरपालिका मंडयांमध्ये स्थित 1,463 मटण/चिकन दुकानांवर व्यवसायविशिष्ट कचरा शुल्क देखील आकारले नाही (डिसेंबर 2021).

उपलब्ध अभिलेख्यांनुसार (मार्च 2017)1999 ते 2007 ह्या कालावधीत 1,251 मटण विक्रेते होते. या 1,251 विक्रेत्यांकडून ₹ 3.23 कोटींचे वसुलीयोग्य व्यवसायविशिष्ट कचरा शुल्क होते, त्यापैकी, 275 विक्रेत्यांकडून ₹ 32 लाख वसूल करण्यात आले आणि 976 विक्रेत्यांकडून ₹ 2.91 कोटी थकीत होते. 2007 नंतर विक्रेत्यांकडून मागणी केल्याचे तपशील आणि वसूल रक्कम यांची नोंद उपलब्ध नव्हती. अद्ययावत नोंदीच्या अभावी लेखापरीक्षेला प्रत्यक्ष थकबाकी निश्चित करता आली नाही.

उत्तरात विभागाने सांगितले (डिसेंबर 2021) की थकीत व्यवसायविशिष्ट कचरा शुल्काची वसुली लवकरच केली जाईल.

थकीत रकमेसंबंधीच्या नोंदीचे अयोग्य संनियंत्रण आणि विविध शुल्कांची कमी वसुली ही बाजार विभागातील अपर्याप्त अंतर्गत नियंत्रणे आणि सुमार संनियंत्रण दर्शवते.

2.2.5 निष्कर्ष

बृहन्मुंबई महानगरपालिका फळे, भाजीपाला, मांस इ.च्या विक्रीसाठी सार्वजनिक मंडया बांधते, देखरेख करते आणि त्यांचे नियमन करते. समावेशक आरक्षण योजनेअंतर्गत बांधलेल्या मंडई इमारतीचे लक्षणीय क्षेत्र एकतर वापरले गेले नव्हते किंवा रिकामे होते. भाडेपट्टा करारातील अटींचा भंग करूनही भाडेपट्टादाराला बाहेर काढण्यासाठी ठोस कारवाई करण्यात बाजार विभाग अपयशी ठरला. बृहन्मुंबई महानगरपालिकेने बांधलेली दहा मजले असलेली मंडईची इमारत सहा वर्षांहून अधिक काळ मंडई सेवांसाठी वापरली जात नव्हती. विद्यमान मोडकळीस आलेल्या मंडयांचा पुनर्विकास आणि

दुकान मालकांचे पुनर्वसन यातील प्रगती बेताची होती. थकबाकीशी संबंधित अभिलेखे अयोग्य पद्धतीने ठेवणे आणि विविध शुल्काची कमी वसुली हे बाजार विभागातील अपर्याप्त अंतर्गत नियंत्रणे आणि सुमार संनियंत्रण दर्शविते.

2.2.6 शिफारशी

शासनाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला निर्देश द्यावे:

- कारणांचे विश्लेषण करावे आणि समावेशक आरक्षण योजनांतर्गत बांधलेल्या बाजारसेवांसाठीच्या मंडयांचा जास्तीतजास्त उपयोग करण्यासाठी पावले उचलावी तसेच भाडेपट्टा करारातील अटींचा भंग केल्याबद्दल भाडेपट्टादारांवर ठोस कार्यवाही करावी.
- सर्व पुनर्विकास प्रकल्पांचा आढावा घ्यावा आणि ते वेळेत पूर्ण होण्यासाठी कार्यवाही करावी.
- विविध शुल्कांच्या वसुलीसाठी अभिलेखे योग्य पद्धतीने ठेवण्याची सुनिश्चिति करावी आणि बाजार विभागातील अंतर्गत नियंत्रणे आणि संनियंत्रण बळकट करावी.

नगर विकास विभाग

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका

2.3 निष्फळ खर्च

प्रतिबंधित क्षेत्रामध्ये उभारलेला मलनि:सारण प्रक्रिया संयंत्र जमीनदोस्त करावे लागल्याच्या परिणामी ₹ 3.25 कोटी खर्च निष्फळ झाला

केंद्र पुरस्कृत अटल मिशन फॉर रिजुवेनेशन ॲण्ड अर्बन ट्रांसफॉर्मेशन (अमृत) योजने अंतर्गत पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील जुन्या भागामध्ये मलनि:सारण व्यवस्थेचे पुनर्वसन/विस्तारीकरण करण्याच्या ₹ 147.84 कोटींच्या योजनेला महाराष्ट्र शासनाच्या नगर विकास विभागाने प्रशासकीय मंजुरी (ऑक्टोबर 2017) दिली. मलनि:सारण व्यवस्थेच्या पुनर्वसन/विस्तारीकरणाखेरीज हवेली तालुक्यातील तीन ठिकाणी (चिखली, पिंपळे निलख आणि बोपखेल) मलनि:सारण प्रक्रिया संयंत्र उभारण्याचे काम अंतर्भूत होते. कामाची निविदा रक्कम

₹ 148.99 कोटी होती, ती कंत्राटदाराला ₹ 156.07 कोटी (मलनि:सारण प्रक्रिया संयंत्राचे ₹ 22.51 कोटी सहीत) किमतीला दिली (मार्च 2018). काम दोन वर्षात पूर्ण करावयाचे होते.

सह शहर अभियंता, पाणी पुरवठा व जलनि:सारण विभाग, पिंपरी-चिंचवड महानगरपालिका यांच्या अभिलेख्यांच्या छाननी (मार्च 2020) मध्ये असे उघड झाले की नगर विकास विभागाने वाहनतळ, खुली भाजी मंडई, उद्यान, मोकळ्या जागा, स्मशानभूमी व दफनभूमी सार्वजनिक शौचालय किंवा तत्सम वापराव्यतिरिक्त इतर बांधकामांना निळी रेषा[22] व नदी किनारा क्षेत्रामधील जागेत बांधकाम करण्यास प्रतिबंध करणारी सुधारणा पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीमध्ये करून अधिसूचना जारी केली (सप्टेंबर 2017). नगर विकास विभागाची अधिसूचना असूनही, इंद्रायणी नदीच्या निळी रेषा क्षेत्रात एक मलनि:सारण प्रक्रिया संयंत्र (चिखली येथे) आणि मुळा नदीच्या निळी रेषा क्षेत्रात दोन मलनि:सारण प्रक्रिया संयंत्र (पिंपळे निलख व बोपखेल येथे) उभारणीचे काम पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने मार्च 2018 मध्ये दिले. तथापि, चिखली येथील मलनि:सारण प्रक्रिया संयंत्र उभारणी विरोधात एका निवासी संस्थेने राष्ट्रीय हरित लवाद, नवी दिल्ली येथे दाखल (मे 2019) केलेल्या याचिकेवर निर्णय देताना राष्ट्रीय हरित लवादाने मलनि:सारण प्रक्रिया संयंत्र प्रतिबंधित जागेवर म्हणजेच इंद्रायणी नदीच्या निळी रेषा क्षेत्रामध्ये येत असल्याच्या कारणामुळे चिखली येथील मलनि:सारण प्रक्रिया संयंत्र जमीनदोस्त करण्याचे निर्देश (जानेवारी 2020) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला दिले. राष्ट्रीय हरित लवादाच्या आदेशाच्या विरोधात दिलासा मिळण्यासाठी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने माननीय सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल केली, (फेब्रुवारी 2020) जी माननीय सर्वोच्च न्यायालयाने फेटाळली (जून 2020).

त्यामुळे, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने चिखली येथील मलनि:सारण प्रक्रिया संयंत्र जमीनदोस्त केले (जून 2020), तर स्थित असलेल्या पिंपळे निलख येथील मलनि:सारण प्रक्रिया संयंत्र येथील उभारणीचे काम मुळा नदीच्या निळ्या रेषा क्षेत्रामध्ये येत असल्यामुळे थांबवले. बोपखेल येथील मलनि:सारण प्रक्रिया संयंत्र उभारणीचे काम सुरु झाले नव्हते. पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने सर्व तीनही मलनि:सारण प्रक्रिया संयंत्र स्थलांतरीत करण्याचे ठरविले आणि शासनाने सुधारीत बृहद प्रकल्प आराखडा एप्रिल 2021 मध्ये मंजूर केला. मार्च 2018 मध्ये ₹ 22.51 निविदा किंमतीच्या ऐवजी नवीन जागी तीन मलनि:सारण प्रक्रिया संयंत्र उभारणीची अंदाजित किंमत ₹ 40.82 कोटी झाली. निविदा प्रक्रिया प्रगतिपथावर होती (नोव्हेंबर 2021).

लेखापरीक्षेच्या असेही लक्षात आले की राष्ट्रीय हरित लवादाने पूर्वी 2014 मध्ये, पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला, जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांचे प्रचलित (सप्टेंबर 1989) परिपत्रक निळी रेषा क्षेत्रामध्ये बांधकाम करण्यास प्रतिबंध करते या कारणाकरिता पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने दफनभूमीच्या संरक्षक भिंतीचे केलेले काम जे पवना नदीच्या निळी रेषा

---

[22] निळी रेषा म्हणजे मागील 25 वर्षांत पाणी एकदाच त्या रेषेपर्यंत पोहोचल्याचे दर्शविणारी रेषा

क्षेत्रात येत असल्यामुळे पाडण्याचे आदेश दिले होते. लेखापरीक्षेला असेही निदर्शनास आले की जल (प्रतिबंध व प्रदूषण नियंत्रण) अधिनियम, 1974 च्या कलम 25 अंतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून (मलनि:सारण प्रक्रिया संयंत्र उभारणीसाठी) पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने परवानगी सुद्धा घेतली नव्हती.

लेखापरीक्षेला असे लक्षात आले की, प्रशासकीय मंजुरी देण्याआधी, सप्टेंबर 2017 मध्ये विकास नियंत्रण नियमावलीमध्ये सुधारणा होण्यापूर्वी बृहद प्रकल्प आराखडा प्राप्त झाला होता, ही बाब लक्षात घेता, मलनि:सारण प्रक्रिया प्रकल्प निळी रेषा क्षेत्रात आहे की नाही ह्याची पिंपरी- चिंचवड महानगरपालिकेकडून खात्री करून घेण्यात नगर विकास विभाग अपयशी ठरला. शिवाय, नगर विकास विभागाची सप्टेंबर 2017 मधील अधिसूचना आणि त्या आधीचा राष्ट्रीय हरित लवादाचा 2014 मधील आदेश जरी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेला माहीत होता, तरी त्यांनी प्रतिबंधित क्षेत्रात मलनि:सारण प्रक्रिया संयंत्र उभारणीचे काम केले. त्यानंतर सर्व तीनही मलनि:सारण प्रक्रिया संयंत्र उभारणीच्या ठिकाणातील बदलामुळे ₹ 3.25 कोटी केलेला खर्च निष्फळ ठरला, शिवाय बांधकाम किंमतीत ₹ 18.31 कोटींची वाढ झाली.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने उत्तरात सांगितले (नोव्हेंबर 2021)की बृहद प्रकल्प आराखड्यातील मलनि:सारण प्रक्रिया संयंत्र उभारणीची ठिकाणे, नगर विकास विभागाने 2010 मध्ये मंजूर केलेल्या विकास आराखड्यानुसार होती. नगर विकास विभागाला बृहद प्रकल्प आराखडा मार्च 2016 मध्ये सादर केला होता जो नगर विकास विभागाने मंजूर केला होता. त्यामुळे पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेवर जबाबदारी निश्चित करण्याचा प्रश्नच उद्भवत नाही. शासनाने पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या उत्तरास डिसेंबर 2021 मध्ये मान्यता दिली. उत्तर स्वीकारार्ह नव्हते, कारण सप्टेंबर 2017 मध्ये विकास नियंत्रण नियमावलीमधील सुधारणा जी निळी रेषा क्षेत्रात बांधकामे प्रतिबंधित करते, त्यानुसार प्रशासकीय मंजुरी व बांधकाम हे त्यास अनुरूप असणे आवश्यक होते.

सप्टेंबर 2017 मध्ये नगर विकास विभागाने अधिसूचना जारी केली आहे हे माहीत असूनही प्रतिबंधित क्षेत्रातील बांधकामाला प्रशासकीय मंजुरी देण्याआधी योग्य दक्षता न बाळगल्याबद्दल शासनाने नगर विकास विभाग आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेमधील दोषी अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करावी. शासनाने भविष्यातील प्रकल्पांमध्ये अशा प्रकारचे उल्लंघन टाळण्यासाठी आवश्यक पावले सुद्धा उचलावी.

नगर विकास विभाग

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

2.4 कंत्राटदारांना अदेय फायदा

दरसूचीमध्ये वरकड (ओव्हरहेड) आणि नफ्याची टक्केवारी समाविष्ट असूनही त्यांचा अतिरिक्त भार निविदा अटींमध्ये समावेश केल्याच्या परिणामी तीन कंत्राटांमधील अतिरिक्त बाबींवर कंत्राटदारांना ₹ 4.36 कोटींचा अदेय फायदा झाला.

बऱ्याच वेळा मूळ करारात समाविष्ट नसलेल्या कामांच्या बाबी कार्यान्वित करणे आवश्यक असते. अश्या कामांच्या बाबींना 'अतिरिक्त बाबी' असे म्हटले जाते. अश्या अतिरिक्त बाबींची प्रदाने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित जिल्हा दरसूचीनुसार मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून केली जातात आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित जिल्हा दरसूचीमध्ये बाब उपलब्ध नसेल तर बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दरपत्रकानुसार दर आकारले जाऊ शकतात. कामाच्या अनुसूचीतील दर हे वरकड(ओव्हरहेड) शुल्क[23] आणि कंत्राटदाराच्या नफ्यासह[24] असतात.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अभियांत्रिकी विभागाच्या 17 कंत्राटांच्या चाचणी तपासणीत (जानेवारी ते मार्च 2021) मध्ये उघड झाले की तीन कंत्राटांमध्ये अतिरिक्त बाबींच्या प्रदानाची निविदा अट उर्वरित कंत्राटांमधील निविदा अटींशी विसंगत होती. या तीन कंत्राटांमध्ये सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित जिल्हा दरसूचीनुसार आणि सार्वजनिक बांधकाम विभागाच्या प्रचलित जिल्हा दरसूचीमध्ये बाब उपलब्ध नसल्यास अतिरिक्त बाबींसाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या अनुसूचीनुसार वरकड(ओव्हरहेड्स) व नफ्यासाठी निर्दिष्ट टक्केवारीने वाढवून देणे निर्धारित केले होते. लेखापरीक्षेच्या असे निदर्शनास आले की तीन कंत्राटांपैकी एका कंत्राटामध्ये वरकड (ओव्हरहेड्स) आणि नफ्याची टक्केवारी 15 टक्के निर्धारित केली होती, तर उर्वरित दोन कंत्राटांमध्ये वरकड (ओव्हरहेड्स) आणि नफ्याची टक्केवारी आठ टक्के होती जी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम विभागाच्या नियमपुस्तिकेत नमूद केलेल्या मानक अटींशी विसंगत होती. दोन भिन्न टक्केवारींसह सदोष निविदा अटी घालणे हे अनियमित होते. याच्या परिणामी एप्रिल 2015 ते सप्टेंबर 2021 **(परिशिष्ट 2.4.1)** या कालावधीत या तीन कंत्राटांमधील कंत्राटदारांना ₹ 4.36 कोटींचा अदेय फायदा झाला.

एक कंत्राट (परिशिष्टामधील अ.क्र.1) ज्यामध्ये मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अतिरिक्त बाब प्रदान केली होती, लेखापरीक्षेच्या असे लक्षात आले की पहिल्या दोन अतिरिक्त बाब दरसूची मंजूर करताना तत्कालीन महानगर आयुक्तांनी 15 टक्के वरकड (ओव्हरहेड) आणि नफ्याचा भार जिल्हा दरसूचीतही वरकड (ओव्हरहेड्स) आणि नफा समाविष्ट होता या आधारावर

---

[23] वरकड (ओव्हरहेड) शुल्क: सार्वजनिक बांधकाम विभाग: 10 टक्के, बृहन्मुंबई महानगर पालिका: पाच टक्के

[24] नफा: सार्वजनिक बांधकाम विभाग व बृहन्मुंबई महानगरपालिका दोघांसाठी प्रत्येकी 10 टक्के

नाकारले होते (ऑक्टोबर 2016). त्याप्रमाणे, पहिल्या दोन अतिरिक्त बाबी दरसूचीच्या संदर्भातील देयके 15 टक्के वरकड (ओव्हरहेड) आणि नफ्याच्या भाराशिवाय प्रदान करण्यात आली. परंतु तिसरी आणि चौथी अतिरिक्त बाबी दरसूची मंजूर करताना महानगर आयुक्तांनी 15 टक्के वरकड (ओव्हरहेड) व नफ्याच्या भारास मान्यता दिली (जानेवारी 2020) आणि त्याचे प्रदान केले (डिसेंबर 2020).

दोन भिन्न टक्केवारीसह सदोष निविदा अटी समाविष्ट केल्याने कंत्राटदारांना ₹ 4.36 कोटींचा अदेय फायदा झाला.

भविष्यात अशा सदोष अटी निविदांमध्ये समाविष्ट होणार नाहीत ह्याची खात्री करण्यासाठी आणि अनियमिततेची जबाबदारी निश्चित करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने अंतर्गत नियंत्रणे मजबूत करावी.

उत्तरामध्ये शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की कंत्राटदारांना केलेली प्रदाने वसूल केली जाणार आहेत आणि सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र किंवा सल्लागार अभियंत्यांच्या आंतरराष्ट्रीय फेडरेशनच्या मानक बोली दस्तऐवजाच्या आधारे निविदा अटींचे मानकीकरण करण्यासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने परिपत्रक जारी केले आहे.

नगर विकास विभाग

बृहन्मुंबई महानगर पालिका

2.5 मालमत्ता कराची कमी आकारणी

मालमत्तेच्या भांडवली मुल्याची चुकीची गणना केल्यामुळे मालमत्ता कराची ₹ 7.85 कोटींची कमी आकारणी झाली.

मुंबई महानगरपालिका अधिनियम, 1888 च्या कलम 139 अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील जमीन आणि इमारतींवर बृहन्मुंबई महानगरपालिका मालमत्ता कर आकारते. मालमत्ता करामध्ये पाणी कर, मलनिःसारण कर, सामान्य कर, शिक्षण उपकर इ.चा समावेश असतो. जमीन आणि इमारतींच्या भांडवली मुल्यावर मालमत्ता कर आकारला जातो. महाराष्ट्र शासनाच्या नोंदणी आणि मुद्रांक विभागाद्वारे जारी केलेल्या मुद्रांक शुल्क दर कोष्टकामध्ये

दर्शविल्याप्रमाणे आणि जमिनीचा प्रकार व स्वरूप, इमारतीची संरचना, जमिनीचे क्षेत्रफळ, इमारतीचे चटई क्षेत्र, वापरकर्ता श्रेणी जसे की निवासी, व्यावसायिक इ. नुसार इमारतीचे किंवा जमिनीचे भांडवली मूल्य ठरविले जाते. 2010 आणि 2015 मध्ये जमीन आणि इमारतींचे भांडवली मूल्य निश्चित करण्यासाठी तयार केलेल्या नियमांमध्ये नमूद जमिनीचा प्रकार व स्वरूप, इमारतीची संरचना, जमिनीचे क्षेत्रफळ, इमारतीचे चटई क्षेत्र, वापरकर्ता श्रेणी जसे की निवासी, व्यावसायिक इ. घटकांचे बृहन्मुंबई महानगरपालिका महत्व निश्चित करते. मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम 154 मध्ये समाविष्ट तरतुदींनुसार दर पाच वर्षांनी जमीन आणि इमारतीचे भांडवली मूल्य सुधारित करणे आवश्यक आहे. 2010 आणि 2015 मध्ये महत्व निश्चित करण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने नियम तयार केले होते.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या के-पश्चिम प्रभागाचे सहाय्यक निर्धारक आणि संकलक कार्यालयाच्या अभिलेख्यांच्या छाननीत (मार्च 2020) असे उघड झाले की जुलै 2014 ते मार्च 2021 या कालावधीत मालमत्ता कराचे चुकीचे वर्गीकरण झाले जे खाली चर्चिले आहे.

भारतीय विमानतळ प्राधिकरणाने जुहू तारा रोड, मुंबई येथील ट्यूलिप हॉटेलसमोरील 5,400 चौ.मी. जमीन वाहनतळ करण्यासाठी मे.एस.एस.एंटरप्राइजेस यांना भाड्याने दिली होती (जुलै 2014). मालमत्ता कर आकारण्यासाठी मालमत्तेचे भांडवली मूल्य ठरवताना (जुलै 2014) बृहन्मुंबई महानगरपालिकेने या जमिनीचे मोकळी जमीन (व्यावसायिक) असे वर्गीकरण करण्याऐवजी मालमत्तेचे दुकान/व्यावसायिक इमारत (स्टील्ट/बेसमेंट/तळघर/पोडियम मधील वाहनतळ) असे चुकीचे वर्गीकरण केले. चुकीच्या वर्गीकरणामुळे मालमत्तेच्या भांडवली मुल्याची चुकीची गणना झाली ज्याच्या परिणामी **तक्ता 2.5.1** मध्ये दर्शविल्याप्रमाणे मालमत्ता कराची कमी आकारणी झाली.

तक्ता 2.5.1 : भांडवली मुल्याच्या चुकीच्या मुल्यांकनामुळे मालमत्ता कराची चुकीची आकारणी

तपशील	बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेले निर्धारण	लेखापरीक्षा गणनेनुसार निर्धारण	बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेले निर्धारण	लेखापरीक्षा गणनेनुसार निर्धारण
	2010 च्या नियमांनुसार		2015 च्या नियमांनुसार	
मुद्रांक शुल्क दर कोष्टकाप्रमाणे (प्रति चौरस मीटर) (बिव्ही) मूळ किंमत	4,24,200	1,69,700	4,87,800	1,95,200
वापरकर्ता वर्गीकरणानुसार/श्रेणी निश्चिती/महत्व (यूसी)	0.25	1.25	0.80	1.25
इमारतीचे स्वरूप आणि प्रकारासाठी निश्चिती (एनटीबी)	0.50	मोकळी/खुली जमीन असल्यामुळे लागू नाही	0.50	मोकळी/खुली जमीन असल्यामुळे लागू नाही
इमारतीचे वय (एएफ)	1	मोकळी/खुली जमीन असल्यामुळे	1	मोकळी/खुली जमीन असल्यामुळे लागू नाही

तपशील	बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेले निर्धारण	लेखापरीक्षा गणनेनुसार निर्धारण	बृहन्मुंबई महानगरपालिकेने केलेले निर्धारण	लेखापरीक्षा गणनेनुसार निर्धारण
	2010 च्या नियमांनुसार		2015 च्या नियमांनुसार	
		लागू नाही		
अनुज्ञेय किंवा मंजूर चटई क्षेत्र निर्देशांक (एफएसआय)(एफएफ)	1	1	1	1
जमिनीचे क्षेत्रफळ (चौ.मी.)(सीए)	6,480[25]	5,400	5,400	5,400
भांडवली मूल्य (₹ कोटीत) (बीव्हीxयूसीxएनटीबीxएएफx एफएफxसीए)	34.36	114.54	105.36	131.76
मालमत्ता कर (टक्केवारी)	0.65	0.82	0.88	1.63
वार्षिक मालमत्ता कर (₹ कोटीत)	0.22	0.93	0.93	2.15
मालमत्ता करातील फरक (₹ कोटीत)	0.71		1.22	

चुकीच्या निर्धारणामुळे ₹ 7.85 कोटी (₹ 0.53 कोटी जुलै 2014 ते मार्च 2015 मध्ये आणि ₹ 7.32 कोटी एप्रिल 2015 ते मार्च 2021 मध्ये) इतकी मालमत्ता कराची कमी आकारणी झाली. मालमत्ता कराचे चुकीचे निर्धारण हे मालमत्तेचे वर्गीकरण करताना अपर्याप्त नियंत्रणे दर्शवितात.

उत्तरामध्ये शासनाने सांगितले की महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकांनी निदर्शनास (मार्च 2017) आणून दिले होते की, मालमत्तेचे भांडवली मूल्य ठरवण्यासाठी वापरकर्ता श्रेणी दुकान व्यावसायिक इमारत (स्टील्ट/पोडियम/तळघरामधील वाहनतळ) ऐवजी दुकान व्यावसायिक इमारत (तांत्रिक उद्वाहनासहित/विना उद्वाहन विशेष कार पार्किंग संरचना) अशी सुधारली जावी. त्यानुसार, बृहन्मुंबई महानगरपालिकेने ऑगस्ट 2017 मध्ये सुधारित देयके जारी केली ज्याच्या विरोधात भाडेतत्त्वाने दिलेली मालमत्ता ही खुली जमीन असून कराचे निर्धारण चुकीचे असल्याचे सांगत, भाडेकरुने अतिरिक्त महापालिका आयुक्त (प्रकल्प) यांच्याकडे अपील दाखल केले (ऑगस्ट 2017). शासनाने पुढे सांगितले की अपीलावरील सुनावणी प्रगतिपथावर आहे आणि अपील निकाली निघाल्यानंतर सुधारित देयके जारी केली जातील.

[25] चटई क्षेत्राऐवजी बांधकाम क्षेत्राचा विचार करण्यात आला

ग्रामीण विकास विभाग

2.6 अतिरिक्त प्रदान

वस्तू व सेवा कराच्या अंमलबजावणीमुळे कंत्राटाची किंमत कमी करण्यात कार्यकारी अभियंता (प्रधानमंत्री ग्राम सडक योजना) यांना आलेल्या अपयशामुळे कंत्राटदारांना ₹ 28.63 कोटींचे अतिरिक्त प्रदान झाले

वस्तु व सेवा कर अधिनियम, 2017, 1 जुलै 2017 पासून अंमलात आला. वस्तु व सेवा कर व्यवस्थेतील कर हे वस्तु व सेवा करपूर्व व्यवस्थेच्या तुलनेत कमी असल्याने आणि कंत्राटदारांकडून नफेखोरी टाळण्यासाठी, महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने एका परिपत्रकाद्वारे (11 सप्टेंबर, 2017) 1 जुलै, 2017 पूर्वी निविदा केलेल्या आणि 1 जुलै, 2017 नंतर अंमलात आणलेल्या सर्व कामांच्या कंत्राटांची किंमत कमी करण्याचे निर्देश सर्व विभागांना दिले. रस्त्यांच्या कामाचे उदाहरण देत कराची कमी[26] दर आकारणी गणना करण्याची पद्धत देखील या परिपत्रकात स्पष्ट केली होती. शिवाय, ग्राम विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या राष्ट्रीय ग्रामीण पायाभूत सुविधा विकास अभिकरणाने प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेची अंमलबजावणी करणाऱ्या सर्व राज्यांतील संबंधित विभागांना असे निर्देश दिले (जून, 2018) की, एकत्रित (सबसम्ड) कर ओळखून 1 जुलै, 2017 नंतर अंमलबजावणी केलेल्या सर्व कामांची प्रदाने करांच्या अचूक अंदाजांनंतर केली जावीत.

नंदुरबार जिल्ह्यातील प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेच्या कार्यकारी अभियंत्याच्या अभिलेख्यांच्या तपासणीत उघड झाले (मार्च 2020), की रस्त्यांची 48 कामे वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणीपूर्वी, म्हणजे 1 जुलै, 2017 पूर्वी दिली गेली होती आणि वस्तु व सेवा कराच्या अंमलबजावणीनंतर कार्यान्वित करण्यात आली होती. ही कामे जरी सर्व कर, शुल्क, आकारणी, उपकर इत्यादिचा समावेश करून स्विकृत किंमतीवर कंत्राटदारांना बहाल केली होती तरी वित्त विभागाच्या सप्टेंबर 2017 च्या परिपत्रकामधील निर्देशानुसार प्रदाने मुक्त करण्यापूर्वी किंमत कमी करण्याची कृती केली गेली नाही, ज्याची परिणीती कंत्राटदारांना अतिरिक्त प्रदान करण्यात झाली.

वित्त विभागाच्या परिपत्रकानुसार इतर जिल्ह्यांमध्ये कारवाई केली गेली की नाही ह्याची सुनिश्चिती करण्यासाठी लेखापरीक्षेने महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास व पंचायती राज विभागाकडून संपूर्ण राज्याची माहिती मागवली (मार्च 2020 ते फेब्रुवारी 2021). प्राप्त माहितीवरून असे लक्षात आले की 34 जिल्ह्यांपैकी 29[27] जिल्ह्यांत जेथे योजना लागू केली होती, (नंदुरबार जिल्ह्यासह) रस्त्याच्या 1,243 कामांमध्ये

---

[26] वस्तु व सेवाकर पूर्व कराचा दर: 13.46 टक्के (मूल्यवर्धित कर 5 टक्के), अबकारी 6.22 टक्के, मूल्यवर्धित करधारणा 2.24 टक्के; वस्तु व सेवाकर: 12 टक्के

[27] पालघर, रायगड, सिंधूदुर्ग, सांगली आणि सातारा ह्या पाच जिल्ह्यांनी माहिती सादर केली नाही/दिली नाही

(प्रधानमंत्री ग्राम सडक योजना:161, मुख्यमंत्री ग्राम सडक योजना: 1,082) प्रदाने मुक्त करण्याआधी कंत्राटाची किंमत कमी करण्यात आली नव्हती.

अशाप्रकारे, वित्त विभागाच्या निर्देशांनुसार, कंत्राटदारांना प्रदाने मुक्त करण्याआधी कंत्राटाची किंमत कमी करण्यात कार्यकारी अभियंता (प्रधानमंत्री ग्राम सडक योजना) यांना आलेल्या अपयशामुळे कंत्राटदारांना ₹ 28.63 कोटींचे[28] अतिरिक्त प्रदान झाले. 29 जिल्हयांपैकी कोणत्याही जिल्हयात कंत्राटदारांना प्रदाने करण्याआधी कंत्राटाची कमी न केलेली किंमत ही वस्तुस्थिती क्षेत्रीय विभागातील अंतर्गत नियंत्रण कमकुवत दर्शविते. शिवाय क्षेत्रीय विभागांना जारी केलेल्या निर्देशांच्या अनुपालनावरील ग्रामविकास विभागाचे सुमार संनियंत्रण दर्शविते. ग्राम विकास विभागाने अंतर्गत नियंत्रण आणि संनियंत्रण यंत्रणा मजबूत करावी आणि मुक्त केलेले अतिरिक्त प्रदान वेळेत वसूल करण्यासाठी कार्यवाही करावी.

उत्तरात शासनाने असे सांगितले (डिसेंबर 2021) की वित्त विभागाच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार वस्तु व सेवा कराची रक्कम समायोजित केल्यानंतरच अंतिम प्रदाने करण्याचे आदेश सर्व कार्यकारी अभियंता (प्रधान मंत्री ग्राम सडक योजना) यांना जारी केले आहेत. क्षेत्रीय विभागांना जारी केलेल्या निर्देशांच्या अनुपालनाची खात्री करण्यात आणि अंतर्गत नियंत्रणे आणि संनियंत्रण यंत्रणा मजबूत करण्याबाबत केलेल्या कृतीबद्दल ग्रामविकास विभागाला आलेल्या अपयशाबद्दल शासनाने काहीही वक्तव्य केले नाही.

जलसंपदा विभाग

2.7 निधिची अडवणुक

₹ 250.03 कोटी खर्च झालेल्या अपूर्ण जलविद्युत प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यास विलंब झाल्यामुळे सहा वर्षाहुन अधिक काळ निधिची अडवणूक झाली

जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन यांनी कोयना धरणाच्या डाव्या तीरावर कोयना धरण पायथा 2x40 मेगा वॅट जलविद्युत (उदंचन[29] साठा) प्रकल्पाच्या बांधकामासाठी ₹ 379.78 कोटिंची प्रशासकीय मान्यता (फेब्रुवारी 2004) दिली. वीजनिर्मितीचा अंदाजित खर्च ₹ 2.49 प्रति यूनिट होता आणि प्रकल्पाचे लाभव्यय गुणोत्तर 1.81 होते. प्रकल्पावरील खर्च प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त झाल्याने, मुख्य अभियंता

[28] वित्त विभागाच्या 11 सप्टेंबर, 2017 च्या परिपत्रकामधे निर्दिष्ट केलेल्या गणनेच्या आधारे अतिरिक्त प्रदानाचे गणन केले गेले. अतिरिक्त प्रदाने गणन करण्यासाठी 30 सप्टेंबर 2017 नंतर सादर केलेली चालू देयकेच विचारात घेतली गेली

[29] उदंचन पद्धतीच्या प्रकल्पांतर्गत, विद्युतगृहामधून वाहून निम्न जलाशयात आलेले पाणी हे ऊर्ध्व जलाशयात उदंचन करून पुन्हा वीजनिर्मितिसाठी वापर करतात

(स्थापत्य), जलविद्युत प्रकल्प आणि गुणवत्ता नियंत्रण, पुणे यांनी कार्यकारी अभियंता, कोयना बांधकाम विभाग क्रमांक 1, कोयनानगर (विभाग) यांना सुधारित किमतीस मान्यता मिळेपर्यंत काम संस्थगित ठेवण्याचे निर्देश (मार्च 2015) दिले. मार्च 2017 पर्यंत या प्रकल्पावर ₹ 250.03[30] कोटी खर्च झाले होते.

कार्यकारी अभियंता, कोयना बांधकाम विभाग क्रमांक 1, कोयनानगर (विभाग) यांच्या अभिलेख्यांची छाननी (डिसेंबर 2017) आणि जलसंपदा विभाग यांच्याकडून प्राप्त (ऑगस्ट 2021) केलेल्या अतिरिक्त माहितीवरून प्रस्तावाच्या प्रत्येक टप्प्यावर विलंब, विविध विभागांतील समन्वयाचा अभाव आणि वीज निर्मितीच्या म्हणजे थेट निर्मिति (पारंपारिक जलविद्युत प्रकल्प) किंवा उदंचन साठा पद्धती प्रकल्पाला अंतिम स्वरूप देताना विलंब झाल्याचे उघड झाले. हे मुद्दे खाली चर्चिले आहेत.

- मुख्य अभियंता (विद्युत), जलविद्युत प्रकल्प, मुंबई (मुख्य अभियंता, विद्युत) यांनी प्रकल्पाचा खर्च प्रशासकीय मान्यतेच्या 79 टक्के झाल्यावर ऑक्टोबर 2013 मध्येच 1,310.61 कोटिंचा सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव जलसंपदा विभागाला सादर केला होता. एक वर्षापेक्षा जास्त कालावधी उलटून गेल्यानंतर, मुख्य अभियंता, विद्युत यांनी जलसंपदा विभागाने ऑक्टोबर 2013 च्या प्रस्तावात केलेल्या टिप्पणीच्या अनुपालनासहित 1,420.92 कोटिंचा सुधारित प्रस्ताव मे 2015 मध्ये सादर केला. जलसंपदा विभागाच्या निर्देशानुसार, मुख्य अभियंता, विद्युत यांनी 0.65 लाभव्यय गुणोत्तर असलेला ₹ 1,494.95 कोटिंचा सुधारित प्रकल्प खर्चाचा प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडे[31] सादर (सप्टेंबर 2015) केला.
- प्रकल्पातील 12 ते 14 प्रति युनिट वीज दर व्यवहार्य नसल्यामुळे जलसंपदा विभागाने सदर प्रकल्प बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा या तत्त्वावर कार्यान्वित करण्याचा निर्णय (जून 2016) घेतला. उशिराने डिसेंबर 2017 मध्ये, बांधा, वापरा आणि हस्तांतरित करा तत्त्वावरील प्रकल्पासाठी निविदा प्रक्रीयेस गति देण्याकरीता एक कृतीदल स्थापन करण्यात आले. तथापि, त्यास कोणताही प्रतिसाद मिळाला नाही.
- मुख्य अभियंता, विद्युत यांनी ₹ 971.65 कोटिंचा कमी प्रकल्प खर्चासहित सुधारित प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडे सादर (मार्च 2018) केला. कमी किंमतीच्या प्रगत टर्बाइनच्या उपलब्धतेमुळे प्रकल्प खर्चात घट झाली. 1.21 लाभव्यय गुणोत्तरासह समानीकृत वीज दर (लेव्हलाईजड टॅरिफ) ₹ 7.25 प्रति यूनिट होता. हा प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीने मंजूर (मे 2018) केल्यानंतर मुख्य अभियंता (विद्युत) यांनी जलसंपदा विभागाला मंजुरीसाठी सादर केला.

---

[30] स्थापत्य काम: ₹ 140.45 कोटी, आस्थापना खर्च: ₹ 109.58 कोटी, विद्युत व यांत्रिकी कामांच्या कंत्राटदाराकडून वसूल केलेली ₹ 171.52 कोटिंची आगाऊ रक्कम वगळून

[31] 25 कोटिंच्या वरील प्रस्ताव राज्यस्तरीय तांत्रिक सल्लागार समितीकडे सादर करणे आवश्यक होते

- जलसंपदा विभागाने (नोव्हेंबर 2018) ₹ 971.65 कोटिंचा सुधारित प्रस्ताव ऊर्जा विभागाच्या संमतीसाठी सादर केला. परंतु, ऊर्जा विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखाली कार्यरत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितने प्रकल्पातील वीज खरेदीच्या उच्च किंमतीमुळे संमती देण्यास असमर्थता दर्शविली (ऑगस्ट 2019).
- नोव्हेंबर 2018 ला सादर केलेल्या प्रस्तावात प्रक्षेपित केलेल्या 1.21 लाभव्यय गुणोत्तरासहित ₹ 7.25 प्रति युनिट समानीकृत वीज दराच्या तुलनेत जलसंपदा विभागाने ₹ 971.65 कोटिंचा प्रस्ताव परंतु 2.44 लाभव्यय गुणोत्तर आणि ₹ 4.23 प्रति युनिट समानीकृत वीज दरासहित महाराष्ट्र शासनाच्या नियोजन विभाग आणि वित्त विभाग यांना सादर (ऑगस्ट 2019) केला. उजव्या तीर जलविद्युत प्रकल्पाचे आयुष्यमान (नॉरमेटीव लाइफ) (35 वर्षे) झाल्यामुळे प्रकल्पातील पाणी बांधकामाधीन डावा तीर जलविद्युत प्रकल्पाकडे वळविण्याच्या निर्णयामुळे (डिसेंबर 2018) लाभव्यय गुणोत्तरात सुधारणा आणि समानीकृत वीज दरात घट झाली.
- महाराष्ट्र शासनाच्या योजना विभाग आणि वित्त विभागाने जलसंपदा विभागाला ऊर्जा विभागाची संमती प्राप्त करण्याची विनंती (सप्टेंबर 2019) केली. त्यानुसार, जलसंपदा विभागाने ऊर्जा विभागाकड़े त्यांच्या संमतीकरीता सुधारित प्रस्ताव सादर (डिसेंबर 2019) केला. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादितने दहा महिन्यांच्या कालावधीनंतर, उत्पादन खर्चाचा विचार करून प्रस्तावातील परिकल्पित उदंचन पद्धती ऐवजी पारंपारीक वीज निर्मितीसाठी संमती दिली.
- जलसंपदा विभागाने हा प्रकल्प पारंपारिक जलविद्युत प्रकल्प म्हणुन राबविण्यासाठीचा सुधारित प्रस्ताव ऊर्जा विभागाकडे संमतीसाठी सादर (मे 2021) केला. ऊर्जा विभागाची संमती प्रतिक्षित (जुलै 2021) होती.

अशाप्रकारे, या अपूर्ण प्रकल्पाला सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यास उशीर झाल्याने त्यावर झालेला ₹ 250.03 कोटिंचा खर्च मार्च 2015 पासून अडून राहिला. तसेच, वीज निर्मिति पद्धतीत बदल केल्याने यापूर्वी केलेल्या कामावरील जसे की प्रवेश भूयार, वायुविजन भूयार आणि मशीन हॉल इत्यादि वरील ₹ 83.53 कोटिंचा खर्च निष्फळ ठरला आहे.

शासनाने असे सांगितले (ऑक्टोबर 2021) की ऊर्जा विभागाने सप्टेंबर 2021 मध्ये प्रकल्प पारंपरिक जलविद्युत प्रकल्प म्हणून अंमलबजावणी करण्याच्या प्रस्तावाला संमती दिली आहे आणि या संमतीच्या आधारावर सुधारित प्रशासकीय मान्यतेची प्रक्रिया केली जाईल. पुढे असे सांगितले की प्रकल्प कालबद्ध पद्धतीत पूर्ण करण्यासाठी प्रकल्पाची शिल्लक कामे सुरु करण्यात येतील. शासनाने असेही सांगितले की प्रकल्प उदंचन प्रकल्प म्हणून राबविण्यासाठी पुनरावलोकन केले जात आहे.

ही वस्तुस्थिती कायम रहाते की सुधारित प्रशासकीय मान्यतेअभावी प्रकल्प अपूर्ण (ऑक्टोबर 2021) होता, ज्यामुळे सहा वर्षाहून अधिक काळासाठी ₹ 250.03 कोटी इतका निधि अडून राहिला. सुधारित प्रशासकीय मान्यता प्रक्रियेच्या विविध टप्प्यांवर

विलंब झाल्याचे सुद्धा लेखापरिक्षेच्या निदर्शनास आले. तसेच ऊर्जा विभागाकडून प्रतिसाद प्राप्त करण्यातील विलंब हा महत्वपूर्ण राज्य प्रकल्पांकरीता शासनाच्या विभागामध्ये समन्वयाचा अभाव असल्याचे निर्देशित करतो. प्रकल्पाच्या अंमलबजावणीत होणारा विलंब टाळण्यासाठी जलसंपदा विभागाला प्रस्ताव सादर करण्याची आणि मंजूर करण्याची कालमर्यादा निश्चित करुन प्रक्रिया सुलभ करणे आवश्यक आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

2.8 थकित कर्जाची वसुली न करणे

सहकारी सूत गिरण्यांना वितरित केलेल्या दीर्घ मुदतीच्या कर्जाची निकृष्ट वसुली आणि व्याज न आकारणे

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागात मागासवर्गीय (अनुसूचित जाती) सहकारी सूतगिरण्यांना दीर्घ मुदतीचे कर्ज देण्याची योजना मार्च 2000[32] पासून अस्तित्वात होती.

या योजनेनुसार, सहकारी सूत गिरणीच्या एकूण प्रकल्प मूल्याच्या 45 टक्के रक्कम ही सहकार आणि वस्त्रोद्योग विभागाने भागभांडवल म्हणून प्रदान करावयाची होती, पाच टक्के अंशदान हे सहकारी सूत गिरण्यांच्या सदस्यांनी द्यावयाचे होते आणि उर्वरीत पन्नास टक्के रक्कम ही योजनांतर्गत कर्ज म्हणून प्रदान करावयाची होती. प्रकल्पाच्या मुल्याची कमाल मर्यादा ही ₹ 53 कोटी अशी निश्चित केली होती आणि योजनेअंतर्गत द्यावयाच्या दीर्घ मुदतीच्या कर्जाच्या रकमेची कमाल मर्यादा ही ₹ 26.50 कोटी इतकी निर्बंधित केली होती. मार्च 2021 पर्यंत, विभागाने अनुसूचित जातीच्या 13 सहकारी सुत गिरण्यांना ₹ 275.78 कोटी दीर्घ मुदतीच्या कर्जाचे वाटप केले.

विभागाच्या (नोव्हेंबर 2019) आणि आयुक्त, समाज कल्याण, पुणे (आयुक्त) (ऑगस्ट आणि सप्टेंबर 2021) यांच्या अभिलेख्यांच्या छाननीत खालील बाबी आढळून आल्या:

1. योजनेनुसार, भाग भांडवल (सहकार आणि वस्त्रोद्योग विभागाने वितरीत केलेले) व प्रकल्पासाठीचे कर्ज यांचे 90 टक्के संवितरण झाल्याच्या तारखेपासून दोन वर्षांनंतर कर्जाची वसुली करावयाची होती. परतफेडीची संपूर्ण प्रक्रिया ही कर्जाच्या वसुलीला सुरुवात केलेल्या तारखेपासून सहा वर्षाच्या आत पूर्ण करावयाची होती.

[32] ही योजना मार्च 2000 ला सुरू होण्यापूर्वी विभागाने जून 1998 आणि मार्च 1999 दरम्यान अनुसूचित जातीच्या सात सूत गिरण्यांना दीर्घ मुदतीच्या कर्जाचे वाटप केले होते

कर्जाच्या मुद्दलाची वसुली ही 16 त्रैमासिक हप्त्यात आणि व्याजाची वसुली ही आठ त्रैमासिक हप्त्यात करणे आवश्यक होते. लेखापरीक्षेत असे आढळून आले की 13 प्रकल्पांपैकी आठ प्रकल्पांची ₹ 195.88 कोटी एवढी कर्जाची रक्कम वसुलीसाठी देय होती आणि ती रक्कम जून 2016 ते मार्च 2024 पर्यंत पूर्णतः वसूल करावयाची होती **(परीशिष्ट 2.8.1)**. ₹ 195.88 कोटी वसुलीयोग्य रक्कमेपैकी, ₹ 191.97 कोटींची वसुली ऑगस्ट 2021 पर्यंत देय होती, ज्यापैकी, फक्त ₹ 1.10 कोटींची (एका सहकारी सूत गिरणीकडून) वसुली होऊन ₹ 190.87 कोटींची वसुली शिल्लक राहिली. एक वर्ष ते नऊ वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी थकबाकी असलेल्या कर्जाची निकृष्ट वसुली हे प्रलंबित थकबाकीच्या वसुलीसाठी जोरकस आणि प्रभावी पाठपुरावा केला नसल्याचे दर्शविते. लेखापरीक्षेला असे लक्षात आले की जरी आयुक्तांनी आठही सूतगिरण्यांना कर्जाच्या वसुलीसाठी प्रत्येक तिमाहीला मागणीपत्र पाठविले होते, तरी कर्जाची वसुली ही जमीन महसुलाची थकबाकी किंवा योजनेनुसार गहाण ठेवलेल्या मालमत्तेची विल्हेवाट याद्वारे करण्याची कार्यवाही केली नव्हती.

कर्जाची वसुली ही जमीन महसुलाची थकबाकी किंवा योजनेनुसार गहाण ठेवलेल्या मालमत्तेची विल्हेवाट याद्वारे करण्यासाठी केलेल्या कार्यवाहीबाबत शासनाच्या उत्तरात (डिसेंबर 2021) उल्लेख नव्हता.

2. योजनेनुसार, सहकारी सूतगिरणीच्या संचालक मंडळालासुद्धा वितरित केलेल्या कर्जासाठी वैयक्तिकरीत्या जबाबदार धरण्यात येणार होते. लेखापरीक्षेच्या निदर्शनास आले की कर्जाच्या करारात अश्या कलमाचा समावेश असूनही, आयुक्त, समाज कल्याण यांनी वितरित केलेल्या कर्जासाठी संचालकांची संपार्श्विक (कोलॅटरल) सुरक्षा/वैयक्तिक हमी प्राप्त करण्यासाठी कोणतीही कार्यवाही केली नव्हती.

शासनाने उत्तरात (डिसेंबर 2021) कर्ज वितरणासाठी संचालक मंडळाकडून वितरित केलेल्या कर्जासाठी संपार्श्विक सुरक्षा/वैयक्तिक हमी प्राप्त न करण्याच्या कारणांचे स्पष्टीकरण केले नाही.

3. पाच सहकारी सूत गिरण्यांमध्ये, भाग भांडवल व कर्जाची 90 टक्के रक्कम वितरित केली नसल्यामुळे कर्जाची वसुली सुरू झाली नव्हती जे **परिशिष्ट 2.8.2** मध्ये दर्शविले आहे. योजनेतील सदोष अटी ज्यामध्ये कर्ज वसुलीसाठी देय असलेला कमाल कालावधी निश्चित केला नव्हता, ज्यामुळे फक्त कर्जाचीच वसुली लांबणीवर पडली नाही तर देय रकमेची वसुली न होण्याचा धोका सुद्धा वाढला. लेखापरीक्षेस असे आढळून आले की सहकार आणि वस्त्रोद्योग विभागाकडून सहकारी सूत गिरण्यांना वितरित केल्या जाणाऱ्या भाग भांडवलाच्या अटी आणि शर्तीनुसार, भाग भांडवलाच्या पहिल्या हप्त्याच्या वितरणाच्या तारखेपासून पाच वर्षानंतर किंवा सूत गिरणी सुरू झाल्याच्या तारखेपासून तीन वर्षात, जे आधी असेल त्याप्रमाणे, भाग भांडवल वसुलीयोग्य होते. अशी अट

कर्जाची रक्कम वसुलीयोग्य होण्याची नियत वेळ सुनिश्चित करते. आयुक्तांनी कर्जाच्या वसुलीकरिता अटी आणि शर्ती सुधारित करण्यासाठी विभागाला प्रस्ताव सादर (नोव्हेंबर 2019) केला. तथापि, विभागाकडून आयुक्तांच्या प्रस्तावावर कुठलीही कार्यवाही करण्यात आली नाही.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की आयुक्तांच्या प्रस्तावावर कार्यवाही सुरू आहे.

4. योजनेनुसार, राष्ट्रीय कृषि आणि ग्रामीण विकास बँक (नाबार्ड) द्वारे निर्धारित केलेल्या व्याज दराच्या आधारे वित्त विभाग, महाराष्ट्र शासन यांनी कळवल्याप्रमाणे वितरित केलेल्या कर्जाच्या रकमेवरील व्याजाचा दर आणि दंडात्मक व्याज दर आकारला जाणार होता. लेखापरीक्षेला असे आढळून आले की विभागाने वित्त विभागाकडून व्याजदर प्राप्त केला नव्हता. लेखापरीक्षेला असेही आढळून आले की व्याजाच्या दराबाबत विभागाशी संपर्क करण्याऐवजी आयुक्तांनी थेट नाबार्डला व्याजदर सूचित करण्याची विनंती (फेब्रुवारी 2020) केली, जी नाबार्डने, नाबार्ड कुठल्याही औद्योगिक सहकारी संस्थासाठी व्याजदर/दंडनीय व्याजाचे दर निश्चित करत नाही या कारणास्तव नाकारली. त्यानंतर आयुक्तांनी विभागाला व्याजदर कळविण्याची (मार्च 2020 आणि ऑगस्ट 2021) विनंती केली. तथापि, विभागाने आजपर्यंत (डिसेंबर 2021) कोणतीही कार्यवाही केली नाही. लेखापरीक्षेचे असे मत आहे की विभागाला वित्त विभागाकडून व्याजदर प्राप्त करण्यात आणि सहकारी सूतगिरण्यांकडे व्याजाची मागणी करण्यात आलेल्या अपयशामुळे दावा समय-रोधित (टाइम-बार्ड) होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शासनाने सांगितले (डिसेंबर 2021) की आयुक्तांनी सादर केलेल्या प्रस्तावाच्या आधारे व्याजदर निश्चित करण्याची कार्यवाही सुरू आहे.

5. योजनेनुसार, 70 टक्क्यांपेक्षा जास्त अनुसूचित जातीचे सभासद असलेल्या सहकारी सूत गिरण्याच फक्त योजनेअंतर्गत कर्जासाठी पात्र होत्या. जिल्हा समाज कल्याण अधिकारी/विभागीय समाज कल्याण अधिकारी/आयुक्त यांनी कर्ज वाटप करण्यापूर्वी या अटीची पूर्तता केल्याची तपासणी करावयाची होती. लेखापरीक्षेच्या असे लक्षात आले की योजनेअंतर्गत कर्ज वाटप करण्यापूर्वी अशाप्रकारची पडताळणी केल्याचे अभिलेखे आयुक्तांकडे उपलब्ध नव्हते.

शासनाने सांगितले की सभासदांची जात पडताळणी केल्यानंतरच सहकारी सूत गिरण्यांना कर्ज वितरीत करण्यात आले होते. पुढे असेही सांगितले की डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे, जात पडताळणी समित्या आणि संबंधित जिल्ह्यांचे सहाय्यक जिल्हा आयुक्त यांना सहकारी सूतगिरण्याच्या सदस्यांना जातीचे प्रमाणपत्र प्राप्त होण्यासाठी वेळोवेळी शिबिरे आयोजित करण्याची विनंती केली होती. हे उत्तर स्वीकारार्ह नाही कारण याबाबतचा कुठलाही कागदोपत्री

पुरावा उपलब्ध नव्हता आणि हे सूत गिरण्यांच्या सभासदांच्या जात प्रमाणपत्रांची पडताळणी केली नसल्याचे सुद्धा निर्देशित करते.

अशाप्रकारे, योजनांतर्गत दिलेल्या कर्जाची परतफेड निकृष्ट होती आणि ₹ 190.87 कोटीची वसुलीयोग्य रक्कम एक वर्ष ते नऊ वर्षाच्या कालावधी दरम्यान प्रलंबित होती. विभागानेसुद्धा योजनेनुसार दिलेल्या कर्जावर व्याजाची आकारणी करून स्वतःचे आर्थिक हित जोपासले नव्हते किंवा व्याजाची परतफेड करण्यासाठी कुठलीही कार्यवाही केली नव्हती.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग

डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था

2.9 निष्फळ खर्च

उपयोजन आज्ञावलीसाठी (ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर) स्त्रोत सांकेतांक (सोर्स कोड) प्राप्त करण्यात आलेल्या अपयशाच्या परिणामी ₹ 94.38 लाखात खरेदी केलेली आज्ञावली आणि भ्रमणध्वनी संच वापरात आणले गेले नाही

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अंतर्गत असलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, पुणे (बार्टी) या स्वायत्त संस्थेने 'समतादुत प्रकल्प' (प्रकल्प) राबवायचा निर्णय (जुलै 2014) घेतला. या प्रकल्पाच्या उद्दिष्टांमध्ये इतर गोष्टींबरोबरच अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, 1989 च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी लोकांमध्ये जागरूकता आणि जाणीव निर्माण करणे, जातिभेद व्यवस्था आणि त्याच्या मागोमाग येणारा भेदभाव यांचे निर्मूलन करण्याचे समाविष्ट होते. या प्रकल्पांतर्गत, प्रशिक्षित कर्मचाऱ्यांना (समतादुत या नावाने) विविध शासकीय योजनांसाठी संभाव्य लाभार्थी ओळखणे, त्यांना योजना समजून घेण्यात, अर्ज करण्यात मदत करणे आणि अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती (अत्याचार प्रतिबंधक) अधिनियम, 1989 शी संबंधित माहिती प्रदान करणे आवश्यक होते.

बार्टिने भ्रमणध्वनी (मोबाइल) आणि वेब उपयोजन आज्ञावलीची (वेब ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर) रचना, विकास आणि होस्टिंग करण्यासाठी प्रगत संगणन विकास केंद्राला (सेंटर फॉर डेव्हलपमेंट ऑफ ॲडवांस कम्प्युटिंग- सीडॅक[33]) ₹ 80 लाख (कर वगळून) खर्चाचा कार्यादेश जारी (सप्टेंबर 2014) केला. सीडॅक एक वर्षाच्या कालावधीसाठी म्हणजेच 22 ऑक्टोबर 2016 पर्यंत उपयोजन आज्ञावलीची होस्टिंग करण्यासाठी सुद्धा

[33] भारत सरकारच्या सूचना आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान विभागाची वैज्ञानिक संस्था

जबाबदार होते. कामाच्या व्याप्तीमधे समतादुतांच्या स्थानांची माहिती संग्रहीत करण्यासाठी डॅशबोर्ड, जीपीएस ट्रॅकिंगची उपयुक्तता विकसित करण्याबरोबरच लाभार्थ्यांशी संभाषण करताना गोळा केलेल्या चित्रफीती, संभाषण आणि प्रतिमा अपलोड करण्याची सुविधा, उपयोजन आज्ञावलीद्वारे लाभार्थींची माहिती संकलित करण्यासाठी ऑनलाइन सर्वेक्षण फॉर्म संलग्न करण्याची सुविधा, विविध आलेखित (ग्राफिकल) अहवाल तयार करण्यासाठी अहवाल निर्मिती (रिपोर्ट जनरेशन) मॉड्यूल विकसित करण्याचा समावेश होता. बार्टिने, सीडॅकद्वारे निर्माण केलेल्या उपयोजन आज्ञावलीची स्थापना (इंस्टॉलेशन) करण्यासाठी 700 भ्रमणध्वनी ₹ 60.20 लाखात खरेदी (सप्टेंबर 2015) सुद्धा केले. सीडॅकने काम ₹ 94.38 लाखात (करासहित) सप्टेंबर 2015 मध्ये पूर्ण केले.

दरम्यान, बार्टिने समतादुतांना प्रशिक्षण देऊन कंत्राटी पद्धतीने नियुक्त (फेब्रुवारी 2015) केले. उपयोजन आज्ञावली स्थापित केलेले भ्रमणध्वनी समतादुतांना देण्यात येऊन वापरण्यात आले. तथापि, कंत्राट कालावधी पूर्ण झाल्यावर समतादुतांच्या सेवा समाप्त (ऑगस्ट 2016) करण्यात आल्या आणि त्यांना दिलेले भ्रमणध्वनी संच परत घेण्यात आले. त्यानंतर, समतादूत म्हणून काम करण्यासाठी बाह्यस्तोत्र अभिकरणाद्वारे मनुष्यबळ नियुक्त केले जात होते.

महासंचालक, बार्टी यांच्या अभिलेख्यांची छाननी (मार्च 2020) आणि प्राप्त (जून 2021 आणि सप्टेंबर 2021) केलेल्या अतिरिक्त माहितीतून असे उघड झाले की बाह्यस्तोत्र अभिकरणाद्वारे नियुक्त केलेल्या मनुष्यबळाला भ्रमणध्वनी संच पुरवण्यात आले नव्हते. समतादूत त्यांच्या स्वतःच्या भ्रमणध्वनीचा वापर करून लाभार्थ्यांकडून मिळालेली सर्व माहिती ईमेल, व्हॉटसअप किंवा प्रत्यक्ष कागदपत्रांद्वारे पाठवत होते. लेखापरीक्षेला असे लक्षात आले की सीडॅकने त्यांच्या सर्वरद्वारे उपयोजन आज्ञावली होस्टिंग करण्याचे थांबवल्याच्या कारणामुळे समतादूतांना भ्रमणध्वनी संच दिले गेले नव्हते. लेखापरीक्षेच्या असेही निरीक्षणात आले की बार्टीने समतादूतांद्वारे वा इतर विद्यमान पद्धतीने जमा केलेल्या माहिती/विदाचे प्रेषण (ट्रान्समिशन) करण्यासाठी उपयोजन आज्ञावलीचा वापर करण्याचे समर्थन करणारा व्यवहार्यता अहवाल तयार केला नव्हता. सीडॅकचे कंत्राट समाप्त होण्याच्या वेळीसुद्धा उपयोजन आज्ञावली होस्टिंग करण्याची बाब सीडॅककडे उपस्थित केली नाही. लेखापरीक्षेच्या असे लक्षात आले की स्त्रोत सांकेतांक प्राप्त करण्याचा मुद्दा प्रकल्प संचालक (माहिती तंत्रज्ञान) यांनी प्रकल्प संचालक (समतादूत सेल) यांच्याकडे मे 2017 मध्ये उपस्थित केला ज्याचा पाठपुरावा सीडॅककडे केवळ सप्टेंबर 2021 आणि पुन्हा डिसेंबर 2021 मध्ये केला. स्त्रोत सांकेतांकाच्या अभावामुळे खरेदी केलेली उपयोजन आज्ञावली आणि भ्रमणध्वनी एक वर्षांनंतर उपयोगात आले नाही, परिणामी ₹ 94.38 लाखांचा खर्च निष्फळ झाला.

शासनाने उत्तरात सांगितले (डिसेंबर 2021) की सीडॅकला भ्रमणध्वनी उपयोजन आज्ञावली सुरू करण्यासाठी स्त्रोत सांकेतांक हस्तांतरित करण्याची विनंती (सप्टेंबर 2021 आणि डिसेंबर 2021) करण्यात आलेली आहे.

गृहनिर्माण विभाग

महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरण

2.10 निष्क्रिय खर्च

मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ, जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा आणि बृहन्मुंबई महानगरपालिका यांच्यातील समन्वयाच्या अभावाच्या परिणामी रमाबाई आंबेडकर नगर घाटकोपर (पूर्व) येथे ₹ 5.71 कोटी खर्चून बांधलेले बहुउद्देशीय केंद्र पाच वर्षांपेक्षा जास्त काळ निष्क्रिय राहिले

गृहनिर्माण विभाग, महाराष्ट्र शासन यांनी आयुक्त, मुंबई उपनगर जिल्हा यांच्या अखत्यारीत रमाबाई आंबेडकर नगर घाटकोपर (पूर्व) येथे असलेल्या जमिनीवर शौचालये आणि बहुउद्देशीय केंद्र बांधण्यासाठी ₹ 11.60 कोटी मंजूर (मार्च 2010) केले. गृहनिर्माण विभागाने, महाराष्ट्र गृहनिर्माण आणि क्षेत्रविकास प्राधिकरणाचा एक घटक असलेल्या मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाला बांधकाम करण्याचे निर्देश (मार्च 2010) दिले.

मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांनी बहुउद्देशीय केंद्र बांधण्यासाठी वर्ष 2008-09 च्या दर पत्रकावर आधारित ₹ चार कोटींची प्रशासकीय मंजुरी (सप्टेंबर 2010) दिली. निविदा प्रक्रियेच्या वेळेस वर्ष 2010-11 च्या दर पत्रकाचा स्वीकार केल्यामुळे ₹ 5.01 कोटी इतक्या सुधारित प्रशासकीय मान्यतेस मंजुरी (नोव्हेंबर 2012) दिली गेली. स्थापत्य आणि विद्युत कामात वाढ झाल्यामुळे तसेच महानगरपालिकेचे कर आणि सौंदर्यीकरणासाठी ही प्रशासकीय मान्यता ₹ 6.80 कोटी इतकी पुन्हा सुधारित (एप्रिल 2016) केली गेली. ₹ 5.71 कोटी खर्चून मार्च 2016 मध्ये या बहुउद्देशीय केंद्राचे काम पूर्ण झाले. जमीन उपलब्ध न झाल्याने आणि झोपडीधारकांच्या असहकारामुळे एकूण 510 शौचालयांपैकी केवळ 315 शौचालयांचे बांधकाम केले गेले. ह्या बहुउद्देशीय केंद्राचा आजपर्यंत (ऑक्टोबर 2021) वापर करणे बाकी आहे.

मुख्य अधिकारी, मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ यांचेकडील दस्तऐवजांची तपासणी (जुलै 2019 आणि ऑगस्ट 2021) केली असता खालील बाबी आढळून आल्या:

1. विकास आराखड्यामध्ये जिल्हाधिकारी यांच्या अखत्यारीतील ही जमीन सार्वजनिक गृहनिर्माणसाठी राखीव ठेवली होती. बृहन्मुंबईसाठीच्या विकास नियंत्रण नियमावली, 1991 नुसार, जी जागा सार्वजनिक गृहनिर्माणसाठी राखीव ठेवण्यात

येते त्यातील 40 टक्के चटईक्षेत्र निर्देशांक बांधलेल्या घरांच्या स्वरुपात जिल्हाधिकारी यांच्याकडून बृहन्मुंबई महानगरपालिकेला विनाशुल्क सुपूर्द करणे आवश्यक होते.

2. बृहन्मुंबई महानगरपालिकेने बहुउद्देशीय केंद्राच्या बांधकामासाठी मान्यता (सप्टेंबर 2010) दिली आणि मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाला इंटीमेशन ऑफ डिसअप्रुवल (काम सुरू करण्यापूर्वी अटी व शर्तींचे अनुपालन करण्याचे सूचना-पत्र) जारी केले. इंटीमेशन ऑफ डिसअप्रुवलमध्ये नमूद केलेल्या अटींनुसार जिल्हाधिकारी, मुंबई यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेला 44 सदनिका विनामूल्य सुपूर्द करावयाच्या होत्या, त्यातील 22 सदनिका काम पूर्ण व्हायच्या आधी सुपूर्द करावयाच्या होत्या. इंटीमेशन ऑफ डिसअप्रुवलमध्ये असेही नमूद केले होते की जिल्हाधिकारी हे मालक असल्यामुळे त्यांनी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विधी अधिकाऱ्याने तयार केलेल्या करारातील सर्व अटींशी सहमती दर्शवून करार करावा. बृहन्मुंबई महानगरपालिकेने ऑक्टोबर 2010 आणि पुन्हा एप्रिल 2012 मध्ये इंटीमेशन ऑफ डिसअप्रुवलचे पालन करण्याचे म्हणजेच बृहन्मुंबई महानगरपालिकेबरोबर करार करण्याची विनंती केली. तथापि जिल्हाधिकारी यांनी कुठलाही प्रतिसाद दिला नाही. शेवटी जुलै 2018 मध्ये जिल्हाधिकारी यांनी प्रतिसाद दिला आणि कळवले कि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विधी अधिकाऱ्याने तयार केलेला करारनामा सादर न केल्यामुळे करारनामा कार्यान्वित करण्यात आला नव्हता.

3. मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने बृहन्मुंबई महानगरपालिकेला बहूउद्देशीय केंद्राचा भोगवटा प्रमाणपत्र देण्याची विनंती (एप्रिल 2017) केली. इंटीमेशन ऑफ डिसअप्रुवलची पूर्तता न झाल्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेने भोगवटा प्रमाणपत्र देण्याचे नाकारले. लेखापरीक्षेला असे आढळून आले की बृहन्मुंबई महानगरपालिकेकडून भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करण्याची आणि इंटीमेशन ऑफ डिसअप्रुवलच्या अनुपालनाची जबाबदारी मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाची असूनही मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने उशिराने मार्च 2018 मध्ये म्हणजेच बहुउद्देशीय केंद्राचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर दोन वर्षांनी इंटीमेशन ऑफ डिसअप्रुवलची पूर्तता करण्यासाठी प्रकरण जिल्हाधिकारी आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे नेले. भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त न झाल्यामुळे (ऑक्टोबर 2021) पाच वर्षांपेक्षा जास्त काळासाठी नागरिकांच्या लाभार्थ बहुउद्देशीय केंद्राचा वापर होऊ शकला नाही.

अशाप्रकारे, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या पत्रव्यवहारास जिल्हाधिकारी यांनी त्वरित प्रतिसाद न दिल्यामुळे, बृहन्मुंबई महानगरपालिकेने जिल्हाधिकारी यांना कार्यान्वयनासाठी करारनामा सादर करण्यात आलेल्या अपयशामुळे आणि मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाकडून इंटीमेशन ऑफ डिसअप्रुवलच्या अनुपालनाची सुनिश्चितता करण्यातील विलंबाच्या परिणामी ₹ 5. 71 कोटींचा खर्च निष्क्रिय ठरला.

मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने असे उत्तर दिले (सप्टेंबर 2020) की जिल्हाधिकारी आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील करारनामा कार्यान्वित झाल्यानंतर भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केले जाईल. मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाने आजपर्यंत (डिसेंबर 2021) भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त केले नव्हते ही वस्तुस्थिती तशीच रहाते.

हे प्रकरण शासनाला सप्टेंबर 2021 मध्ये संदर्भित केले, डिसेंबर 2021 पर्यंत त्यांचे उत्तर प्राप्त झाले नव्हते.

सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

2.11 टाळता येण्याजोगे प्रदान

करपात्र उत्पन्नाचा चुकिचा अंदाज आणि त्याच्या परीणामी आगाऊ आयकराचे कमी प्रदान याची परिणती आर्थिक वर्ष 2017-18 साठी ₹ 2.36 कोटी व्याजाच्या टाळता येण्याजोग्या प्रदानात झाली

आयकर अधिनियम, 1961 (अधिनियम) च्या कलम 234ब आणि क नुसार निगम (कॉर्पोरेट) करदात्याला वार्षिक 10,000 पेक्षा जास्त कर देय असल्यास कराच्या 90 टक्के रक्कम आगाऊ भरावी लागते. आगाऊ कर संबंधित आर्थिक वर्षाच्या चार तिमाही हप्त्त्यांमधे (15 जून: 15 टक्के, 15 सप्टेंबर: 45 टक्के, 15 डिसेंबर: 75 टक्के, 15 मार्च: 100 टक्के) देय आहे. मार्चपर्यंत आगाऊ कराच्या किमान 90 टक्के रक्कमेचे प्रदान न केल्यास दरमहा एक टक्के दराने व्याज आकारले जाते. (अधिनियमाचे कलम 234ब). तसेच निर्दिष्ट तारखांना आगाऊ कराचा हप्ता न भरल्यास दरमहा एक टक्के दराने व्याज आकारले जाते (अधिनियमाचे कलम 234क).

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ अन्नधान्य, खते, औद्योगिक वस्तु इत्यादिंची साठवण करण्याचे काम करते, आणि अधिनियमाच्या तरतुदींनुसार त्यांच्या निर्धारण केलेल्या उत्पन्नावर आगाऊ कर भरण्यास जबाबदार होते.

महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या अभिलेख्यांच्या छाननीत (डिसेंबर 2019) असे उघड झाले की महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने 2017-18 च्या आर्थिक वर्षासाठी ₹ 14.90 कोटी करदायित्वाची गणना केली आणि ₹ 14 कोटिंची करवजावट गृहीत धरून चौथ्या तिमाहित ₹ 90 लाखाच्या आगाऊ कराचे प्रदान (मार्च 2018) केले. तथापि, नंतर असे लक्षात आले की कराचे अंतिम निर्धारण (सप्टेंबर 2018) करतेवेळी 2017-18 या आर्थिक वर्षाशी संबंधित वखारसाठवण (वेयरहाउसिंग), साठवण व हाताळणी शुल्काचे ₹ 62.47 कोटिंचे उत्प्पन्न देय आगाऊ कराचा अंदाज घेताना विचारात घेतले नव्हते. याच्या परिणामी करदायित्वात अंदाजित ₹ 14.90 कोटिंवरून ₹ 41.19 कोटिंपर्यंत (176 टक्के) वाढ झाली आणि परिणामस्वरूप आगाऊ कराचे

कमी प्रदान झाले. आगाऊ कराच्या प्रत्येक हप्त्यांसह आगाऊ कराच्या कमी प्रदानामुळे महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाला अधिनियमाच्या कलम 234ब आणि कलम 234क अंतर्गत ₹ 1.26 कोटी व ₹ 1.10 कोटी व्याज प्रदान करावे लागले. महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाला सप्टेंबर 2018 मधे स्वयंनिर्धारण करासह एकूण ₹ 2.36 कोटीचे व्याज प्रदान करावे लागले.

अशाप्रकारे, उत्पन्नाचा चुकिचा अंदाज आणि परिणामी आगाऊ कर प्रदान करण्यास विलंब झाल्यामुळे 2017-18 या आर्थिक वर्षासाठी ₹ 2.36 कोटी व्याजाचा भरणा करावा लागला जो टाळता आला असता.

लेखापरीक्षेत असेही लक्षात आले की 2018-19 आणि 2019-20 या आर्थिक वर्षात महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने आगाऊ कराचे जास्त प्रदान केले जे करदायित्वाच्या अनुक्रमे 68 आणि 48 टक्के होते. आगाऊ कर भरण्यासाठी उत्पन्न/नफ्याचा वाजवी अंदाज घेण्यासाठी महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या अंतर्गत नियंत्रणातील कमतरता दर्शवितात .

शासनाने असे प्रतिपादन केले (सप्टेंबर 2020) की सन 2017-18 मध्ये तुरीचा प्रचंड साठा प्राप्त झाला, त्यामुळे आगाऊ कराच्या देय तारखेनंतर प्रत्यक्षात बीजक (बिलिंग) तयार केले गेले, म्हणून आगाऊ कराची परिगणना करण्यासाठी महामंडळ प्रत्यक्ष उत्पन्न काढण्यास असमर्थ होते. हे उत्तर स्वीकारार्ह नाही कारण महामंडळाला तुरीच्या प्रचंड साठ्याची माहीती होती, म्हणून त्याचे बीजक (बिल) तयार करण्याचे प्रलंबित असताना उत्पन्नाचा अंदाज बांधता आला असता. आगाऊ कर भरण्यासाठी उत्पन्नाचा वाजवी अंदाज सुनिश्चित करण्यासाठी महामंडळातील अंतर्गत यंत्रणा मजबूत करण्याचे शासनाने मान्य केले.

मृद आणि जल संधारण विभाग

2.12 निष्फळ खर्च

कालव्याच्या बांधकामासाठी जमीन संपादनात अपयश आल्याने, धरण बांधण्यासाठी झालेला ₹ 15.20 कोटिंचा खर्च निष्फळ ठरला.

मृद व जल संधारण विभाग[34], महाराष्ट्र शासन यांनी रायगड जिल्ह्यामधील रोहा तालुक्यातील पहुर येथील लघु पाटबंधारे प्रकल्पास ₹ 4.36 कोटिंची प्रशासकीय मान्यता (ऑगस्ट 2006) दिली. या प्रकल्पामध्ये 117 हेक्टर जमिनीला सिंचन करण्यासाठी स्थानिक नाल्यावर मातीचे धरण, सांडवा[35] मुख्य नियंत्रक[36] आणि 4.22 किमी उजव्या कालव्याचे बांधकाम करण्याचे समाविष्ट होते.

---

[34] पुर्वीचे नाव ग्रामविकास आणि जलसंधारण विभाग

[35] सांडवा म्हणजे बंधारा किंवा जलाशयातून अतिरिक्त पाणी वाहुन जाण्यासाठी केलेला मार्ग

[36] मुख्य नियंत्रकामध्ये पाण्याच्या वितरणासाठी प्रवाहाचे नियमन करण्यासाठी झडपेचा समावेश असतो

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे (जलसंधारण) विभाग, ठाणे यांनी (जानेवारी 2008) कंत्राटदार 'अ' यांना ₹ 3.92 कोटिंच्या निविदा किमतीला मुख्य धरण, सांडवा आणि मुख्य नियंत्रक बांधण्याचे काम दिले. कामाच्या अंमलबजावणी दरम्यान मृद व जलसंधारण विभागाने ला ₹ 13.24 कोटिंची पहिली सुधारित प्रशासकीय मान्यता (मार्च 2011)आणि ला ₹ 18.74 कोटिंची दूसरी सुधारित प्रशासकीय मान्यता (डिसेंबर 2015) दिली. प्रकल्पाचे काम मे 2016 मध्ये पूर्ण झाले. या प्रकल्पावर भूसंपादन आणि इतर खर्चासहित ₹ 15.20 कोटी खर्च झाले.

जिल्हा मृद व जलसंधारण विभाग, कळवा यांच्या अभिलेख्यांची छाननी (जानेवरी 2021) आणि प्राप्त (सप्टेंबर 2021) केलेल्या अतिरिक्त माहितीमधून असे उघड झाले की प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या 39.35 हेक्टर जामिनीपैकी 30.57 हेक्टर जमीन ही धरण, सांडवा आणि मुख्य नियंत्रणाच्या बांधकामासाठी उपलब्ध असल्यामुळे प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आले. दरम्यान, जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिल्ली मुंबई औद्योगिक कॉरीडोर प्राधिकरणासाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू (2012) केली होती आणि प्रकल्पांतर्गत मूलभूत सिंचन क्षेत्रामध्ये येणारी जमीन ज्यामध्ये कालव्याच्या बांधकामासाठी लागणाऱ्या जमिनीच्या मोठ्या भागाचा समावेश असलेली जमीन 2015 मध्ये भूसंपादित केली गेली. धरणाच्या बांधकामाला चार वर्षाहुन अधिक काळ लोटल्यानंतर जिल्हा जलसंधारण अधिकारी यांनी उपविभागीय जलसंधारण अधिकारी, कोलाड (उपविभाग) यांना 4.22 किमी ऐवजी 1.45 किमी लांबीचा कालवा आणि 117 हेक्टरची लक्षित सिंचन क्षमता साध्य करण्यासाठी नाल्याच्या खालच्या प्रवाहात तीन बॅरेजेस बांधण्यासाठीचे अंदाजपत्रक सादर करण्याचे निर्देश (ऑगस्ट 2020) दिले. लेखापरीक्षेला असे आढळून आले की जरी धरण बांधण्याचे काम जानेवारी 2008 मध्ये देण्यात आले होते तरी 4.22 किमी उजव्या कालव्यासाठी भूसंपादनाची कार्यवाही सुरू केल्याचे दस्तावेज विभागामध्ये उपलब्ध नव्हते. दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरीडोर प्राधिकरणाने 2015 ला जमीन भूसंपादित केल्याची वस्तुस्थिति हे दर्शविते की विभागाने कालव्याच्या बांधकामासाठी आवश्यक जमीन संपादित करण्यासाठी प्रभावी पावले उचलली नव्हती.

अशाप्रकारे, कालव्याच्या बांधकामासाठी आवश्यक जमीन संपादित करण्यातील विभागाच्या अपयशामुळे 117 हेक्टर जमीन सिंचनाच्या उद्देशाने, ₹ 15.20 कोटी खर्चुन बांधलेल्या धरणाचा पाच वर्षाहुन अधिक काळ उपयोग करता आला नाही.

शासनाने (डिसेंबर 2021) असे सांगितले की जिल्हाधिकारी रायगड यांनी दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरीडोर प्राधिकरणासाठी भूसंपादनाची प्रक्रिया 2012 मध्ये सुरु केली आणि लघु पाटबंधारे प्रकल्पात येणारा मोठ्या भागातील जमीन दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरीडोरने भूसंपादित केली होती. पुढे असे नमूद करण्यात आले की 1.45 किमी लांबीच्या कालव्यासाठी स्थानिक शेतकऱ्यांनी भूसंपादनास सातत्याने विरोध केल्याने भूसंपादन सुरु होऊ शकले नाही आणि अंदाजपत्रक सादर केले गेले

नाही. शासनाने सिंचन सुविधा निर्माण करण्यातील असमर्थता मान्य करताना सांगितले की, पिण्याच्या उद्देशाने पाणी पुरवठ्यातुन वार्षिक ₹ 1.04 लाखांचा महसूल प्राप्त होत आहे. भविष्यात लघु पाटबंधारे योजनेतील पाणीसाठा औद्योगिक उद्देशासाठी तसेच मत्स्यपालनासाठी केला जाऊ शकतो.

काम दिल्यावर अथवा तत्पुर्वी भूसंपादनाची कार्यवाही सुरु न करण्याच्या कारणांबाबत शासनाने कोणतेही उत्तर दिले नाही. विभागाचे हे अपयश आणि त्यानंतर दिल्ली-मुंबई औद्योगिक कॉरीडोर प्राधिकरणाद्वारे भूसंपादित केलेली जमीन यामुळे प्रकल्पांतर्गत 4.22 किमीच्या कालव्यासाठी भूसंपादन होऊ शकले नाही. म्हणून शासनाकडे सिंचनाच्या उद्दिष्टाऐवजी अन्य कामांसाठी पाण्याचा वापर करण्याशिवाय पर्याय उरला नाही.

(एस के जयपुरियार)
प्रधान महालेखाकार (लेखापरीक्षा)-I,
महाराष्ट्र, मुंबई

मुंबई
दिनांक 09 मार्च 2022

प्रतिस्वाक्षरित

(गिरीश चंद्र मुर्मू)
भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक

नवी दिल्ली
दिनांक 10 मार्च 2022